# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३८**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक २ / ऑगस्ट २०००

## संपादकीय

भारतात अनेक गोष्टींप्रमाणे वीजनिर्मिती करणाऱ्या बायोगॅस प्रकल्पांना सरकारने प्रोत्साहन दिले आहे. पण अनेक विधायक योजनांप्रमाणे ही योजनाही कागदावरच राहिलेली आहे. अपारंपरिक उर्जानिर्मितीला प्रोत्साहन देणे ही काळाची मोठी गरज आहे. प्रदूषण मुक्त उर्जानिर्मिती जर केली नाही तर पर्यावरणाचा ऱ्हास आहे याच गतीने चालू राहणार आहे. कोट्यावधी रुपयांच्या योजना मंजूर होतात, अनुदाने वाटली जातात पण प्रत्यक्षात असे मोठाले प्रकल्प अर्धवटच पडून राहतात किंवा प्रत्यक्षात सुरूच होत नाहीत. ही अनुदाने जातात कोठे हा संशोधनाचा विषय असला तरी, नसा नसलेला विषय आहे. विहिरी खणण्यासाठी शासन अनुदाने देते. शेती प्रकल्पांसाठीही अनुदाने मिळतात. कागदोपत्री किती विहिरी खणल्या गेल्या, त्यांच्या पाण्याचा किती हेक्टर जमिनीला फायदा होणार आहे हे सर्व व्यवस्थितपणे नोंदले जाते, दाखवले जाते. अनुदाने या आकडेवारीसाठी मान्य होतात. प्रत्यक्षात एकही विहीर खणली जात नाही. आम्ही रुपया मंजूर करतो तेव्हा सामान्य माणसापर्यंत दहाच पैसे पोचतात, असे खुद्द पंतप्रधान असताना राजीव गांधी म्हणाले होते. या विधानातील उघड सत्यावर भाष्य करण्याची गरज नाही, इतका भ्रष्टाचार आमच्या अंगवळणी पडला आहे.

याचा परिणाम म्हणजे प्रचंड प्रमाणात पर्यावरणाची होणारी हानी. सोलर हीटर्स, सोलर कुकर्स या व अशा यंत्रणा वापरून अपारंपारिक उर्जा वापरणे अंगवळणी पडायला हवे. पण सर्व स्तरांवर, सर्वत्र या संकल्पना अजूनही रुजत नाहीत हे दुर्दैव आहे.

याउलट पाश्चात्य देशांत पर्यावरण सजगता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. 'इको फ्रेंडली' याचा नेमका अर्थ तेथे मान्य झाला आहे. बेल्जियम सारख्या भारतातल्या एखाद्या जिल्ह्याच्या आकारा एवढ्या देशात बायोगॅस वीजनिर्मिती प्रकल्प अतिशय यशस्वी पणे चालू आहे. जेंट या बंदराजवळ असणाऱ्या या प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातूनही गुंतवणूक झाली आहे. ८.१ दश लक्ष युरो डॉलर्स गुंतवणूक असणारा हा प्रकल्प अतिशय नमुनेदार

मानण्यात येतो. मानवी मैला, सेंद्रिय कचरा, कत्तलखान्यातील कचरा, अशा विविध प्रकारच्या कचऱ्यापासून या प्रकल्पात बायोगॅस निर्मिती केली जाते. दरवर्षी सुमारे दोन लाख टन कचरा वापरला जातो.

जेंट येथील या प्रकल्पाचे उदाहरण देण्याचे कारण म्हणजे गेली सुमारे सव्वा वर्ष अतिशय नमुनेदार पद्धतीने चालू असणाऱ्या या प्रकल्पासारखे बायोगॅस निर्मितीचे प्रकल्प आपल्या देशात उभारले जाण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या आपरंपरिक उर्जानिर्मितीचे महत्त्व शालेय शिक्षणाच्या स्तरापासून उगवत्या पिढीच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. रुपयातले दहाच पैसे सामान्य माणसापर्यंत पोचत असतील तर नव्वद पैसे कोठे जातात त्याचा शोध घेऊन भ्रष्टाचाराची मुळे उखडून काढली पाहिजेत. शिक्षणाचे राजकारण करणाऱ्या शासनकर्त्यांकडून हे होईल याची शक्यता कमीच आहे. यासाठी शिक्षण प्रक्रियेचे महत्त्व जाणणाऱ्या सेवाभावी व्यक्ती व संस्थांनी पर्यावरण सजगता निर्माण केली पाहिजे. लोकशिक्षणाचीही आत्यंतिक गरज आहे. शाळा महाविद्यालयांतील विद्यार्थी सुसंस्कारित करून या कच्च्या मालातून उद्याचा 'पर्यावरण सजग' नागरिक (म्हणजेच पक्का माल) निर्माण करावयाचा आहे. पर्यावरण सजगता वाढत नाही तोवर आपली प्रत्येक कृती ही पर्यावरण ऱ्हासाच्या दृष्टीने पडणारे पाऊल असेल !

प्रा. मोहन पाठक
कार्यकारी संपादक

• • •

## ।। श्रावण ।।

आला नाचत श्रावण
आल्या पावसाच्या सरी
तहानलेली धरणी
गेली चिंब भिजोनी

मोर रानात नाचतो
थेंब पाण्याचे टिपतो
वाट पाहूनी चातक
थेंब चोचीत झेलतो


जाई जुई मोगरा
चाफा बकुळ फुलला
दाही दिशात सुवास
ओल्या मातीचा दाटला

वर्षा ऋतुत हासली
धरणी साज नवा ल्याली
हिरव्या शालूला किनार
इंद्रधनुची लाभली

श्रावण संपला संपला
भादव्याचा बोलू आला
गणरायाला वंदूया
सकला सुमती धावया.

**मैत्रेयी शेवडे**
१/भरत मॅन्शन, 'बी' केबिन जवळ, ठाणे
दूरध्वनी : ५४० ४५७१

• • •



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक २ / ऑगस्ट २०००

संपादक
श्री. अचलकुमार टिब्रु
कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक
सहसंपादक
सौ. मंजिरी दांडेकर
सहाय्यक मंडळ
सौ. भारती जोशी
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
कायदेविषयक सल्लागार
ॲड. सलील बुटाला
कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४००.६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७०
मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिन्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. मोहन पाठक | |
| २) | तक्षशिला | डॉ. प्रकाश ग. करमरकर | ३ |
| ३) | भाषांतर प्रक्रिया | प्रा. प्रदीप कर्णिक | ९ |
| ४) | लोकमान्य टिळकांनी अभिप्रेत असलेला आदर्श सार्वजनिक गणेशोत्सव | श्री.राजेश प्र. देवधर<br>श्री.मधुकर ग. देवधर | १६ |
| ५) | 'ओशो' आणि प्रेम | श्री. अरविंद दोंदे | १९ |
| ६) | ग्रंथांची उपेक्षा | प्रा. मोहन पाठक | २२ |
| ७) | स्त्री | सौ. वंदना प्रसादे | २४ |
| ८) | गिर्यारोहण | कु. संध्या राव | २७ |
| ९) | विमान सेवेतील व्यवसाय | श्री. प्रवीण वि. प्रधान | २९ |
| १०) | हिरोशिमाच्या कविता | तोगे संकिची | ३२ |
| ११) | एक रोमांचकारी व अद्‌भुत असा अनुभव | श्री. राजाभाऊ गवांदे | ३३ |
| १२) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३६ |


सुविचार संकलन : श्री. चंद्रकांत शिंगाडे (तंत्रनिकेतन, ग्रंथालय विभाग)

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

सर्व देव ही मानवी मनाची निर्मिती आहेत.

# तक्षशिला

## (इ.स. पूर्व ८०० ते इ.स. ४०० सुमारे १२०० वर्षे)

डॉ. प्रकाश ग. करमरकर

*तक्षशिला विश्वविद्यालयाचा इतिहास हे इतिहास विषयातले एक महत्वाचे प्रकरण. या संबंधीचा हा लेख - संपादक*

प्राचीन भारतात तक्षशिला विश्वविद्यालयाला समकालीन अशी उज्जयिनी, कान्यकुब्ज, काशी इत्यादि विद्यापीठे होऊन गेली. या सर्व विद्यापीठांना लाभलेली तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा विचार करता ह्या विद्यापीठांची कामगिरी निःसंशय कौतुकास्पद होती. ह्यात दुमत असण्याचे कारण नाही. वेदकालीन विद्यापीठ म्हणून काशी विद्यापीठाचा उल्लेख करण्यात येत असला तरी सुव्यवस्थित प्राचीन विद्यापीठ म्हणून तक्षशिलेचा उल्लेख करण्यात येतो. इ.स. पूर्व ८०० ते इसवी सनाची ४०० वर्षे असा एकूण १,२०० वर्षांचा कालावधी तक्षशिला विद्यापीठाचे मूल्यमापन करण्यासाठी लक्षात घेणे योग्य ठरते. तक्षशिला एक नगरी या संबंधाने सर्वांत प्राचीन उल्लेख रामायण, महाभारतादी संस्कृत ग्रंथांत व जातकादी पाली ग्रंथांत वेळोवेळी आढळतात. तसेच ग्रीक व चिनी लेखक यांच्या ग्रंथातूनही तक्षशिले संबंधीची माहिती उपलब्ध आहे. विशेषतः अरायन, प्लिनी, प्ल्युटार्क, टॉलमी, स्ट्रॅबो, डायोनिशियन तसेच ह्युएनत्संग व फहियान यांच्या ग्रंथात तक्षशिलेबाबत उल्लेख आहेत.

ही प्राचीन नगरी भारताच्या वायव्येकडील गांधार देशाची राजधानी होती. हा देश म्हणजे वायव्य सरहद्दीवरील कंदाहार प्रांत होय. फार प्राचीन कालापासून हा प्रदेश प्रसिद्ध असून धृतराष्ट्रपत्नी गांधारी ही या देशाच्या राजाची कन्या होती. तत्कालीन गांधार देश म्हणजेच सध्याच्या रावळपिंडीच्या वायव्येस वीस मैलावर सराईकला नावाचे जे रेल्वे जंक्शन आहे त्याच्या ईशान्येस हा भाग येतो. सध्या हा प्रदेश पाकिस्तानच्या हद्दीत येतो. त्या काळात एक प्रकारे भारताच्या सरहद्दीवरील भाग असल्याने या प्रदेशात चिरस्थायी शांतता नांदणे शक्यच नव्हते. भारतेतर राजांना या प्रदेशातूनच भारतात प्रवेश मिळवावा लागे. इराणच्या राजाने या प्रदेशातूनच भारतात प्रवेश मिळवावा लागे. इराणच्या राजाने इ.स. पूर्व सहाव्या शतकात, ग्रीस देशाचा राजा अॅलेक्झांडर उर्फ शिकंदर याने इ.स. पूर्व चवथ्या शतकात इंडो-बॅक्ट्रीयन राजांनी इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात, सिरियन राजांनी. इ.स. पूर्व पहिल्या शतकात व कुशाण राजांनी इ.स. नंतरच्या पहिल्या शतकात या देशावर स्वाऱ्या केल्याचे उल्लेख आढळतात.

उत्खननात तक्षशिलेचे अवशेष सापडले असून हा प्रदेश अत्यंत निसर्गरम्य आहे. दोन दिशांना बर्फाच्छादित टेकड्या व उरलेल्या दोन दिशांना लहानमोठ्या टेकड्या. अशा चारी बाजूंनी टेकड्यांच्या कुशीत विसावलेली ही नगरी रम्य बनली असल्यास नवल नव्हे.

### नावाचा विचार

तक्षशिला नगरीला त्याच्याप्रमाणे ह्या विश्वविद्यालयाला ऐतिहासिक महत्त्व बरेच आहे. वाल्मिकी रामायणात तक्षशिलेचा उल्लेख उत्तरकांड सर्ग १०१ मध्ये आढळतो. कैकयीपुत्र भरताने शेवटीजी दोन सुंदर नगरे वसवली त्यात तक्षशिलेचा उल्लेख आढळतो. तसेच महाभारतात स्वर्गारोहण पर्व अध्याय पाचमध्ये जनमेजय

राजा तक्षशिला नगरातून पुन्हा हस्तिनापुरास आला अशी नोंद आढळते. तक्षशिला नगरीला तक्षशिला असे नाव का पडले असावे ह्याचा शोध घेता अनेक कारणे सापडतात. एक म्हणजे तक्षशिला नगरी सभोवताली प्रचंड दगडांचा, शिलांचा जो समूह आहे. शिलांचे जे डोंगर आहेत अथवा टेकड्या आहेत त्यांच्या कुशीत ही नगरी वसली त्यामुळे नागराजा तक्षक आणि ही नगरी यांचा संबंध निरनिराळ्या ग्रंथांतून दर्शविला गेला आहे. त्यामुळेच राजा तक्षक व विपुल प्रमाणात उपलब्ध असलेल्या शिला म्हणून कदाचित ह्या नगरीला तक्षशिला हे नाव पडले असावे. काहींचे म्हणणे असे की राजा तक्षकाने सभोवतालच्या शिलांचा वापर करून ही नगरी वसविली व राज्य केली म्हणूनही तक्षशिला हे नाव पडले असावे. तक्षशिला ही स्थापत्यकला व शिल्पकला शिकण्याचे त्यावेळी मोठे केंद्रच होते. या दोन्ही कलांचा संबंध शिला अथवा शिळा म्हणजे दगडांशी येतो म्हणूनही कदाचित तक्षशिला हे नाव पडले असावे.

तक्षशिला नगरी फार प्राचीन असावी नंतरच्या काळात ही नगरी शिक्षणाचे केंद्र बनली. तक्षशिला नगरीचा उल्लेख अगदी थेट रामायण महाभारत काळापासून जरी असला तरी शिक्षणाचे केंद्र म्हणून ह्या नगरीला इ.स. पूर्व नवव्या शतकात स्थान मिळालेले आढळते. सध्याच्या काळी विद्यापीठाचे जे स्वरूप आहे ते प्राचीन विद्यापीठापेक्षा खूपच वेगळे आहे. इ.स. पूर्व काळापासूनचे अवलोकन केले तर असे आढळून येते की विहार, आश्रम, मठ, चर्च, मद्रसा, परिषदा, मंदिरे ह्यातून शिक्षणाची सोय केलेली असे. सर्वसाधारणपणे शिक्षणसंस्था कोणत्या ना कोणत्यातरी धर्माशी निगडित असत. त्याचाच एक अपरिहार्य परिणाम म्हणजे लेखन वाचनाची म्हणजे ज्ञान संपादन करण्याची कला ठराविक लोकांनाच प्राप्त झाली होती. पौरोहित्य करणारा त्या त्या धर्मातील जो वर्ग होता त्याची मक्तेदारी या क्षेत्रात निर्माण झाली होती. अलीकडील काळात हे स्वरूप खूपच बदलले आहे. तक्षशिलेला शिक्षणाचे केंद्र म्हणून त्यावेळी महत्त्व प्राप्त झाले. त्यावेळी सर्व हिंदुस्थानभर बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला होता. सर्वत्र बौद्ध विहार निर्माण झाले होते. त्यातून मोठ्या प्रमाणात शिक्षण दिले जात असे. त्यावेळच्या बौद्ध धर्मीय शिक्षण संस्थात जी एकवाक्यता होती तीच तक्षशिलेतही होती.

## राजघराणी

तक्षशिलेवर राज्य करणारी निरनिराळी घराणी होऊन गेली. काही राजघराण्यांचा उल्लेख निरनिराळ्या संदर्भग्रंथातून मिळतो. प्रामुख्याने रघुवंशी राजांनी इथे राज्य केले. त्यांचा निश्चित कालावधी सांगता येत नाही. भारतीय युद्धानंतर म्हणजे महाभारतकालीन युद्धानंतर परिक्षिताच्या वंशजानी येथे राज्य केले आणि जनमेजयाने सर्पसत्र हे येथेच केले. गौतम बुद्धांच्या काळी राजा पुक्कुसाती याने इथे राज्य केल्याचा उल्लेख आढळतो तर इ.स. पूर्व सहाव्या शतकात इराणचा शासक कुरुष याने आक्रमण करून हा प्रदेश पादाक्रांत केला व पुढे सुमारे दोनशे वर्षे त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी येथे राज्य केले. शिकंदराच्या काळी तक्षशीला हे विशाल सुशासित आणि धनधान्याने समृद्ध असे नगर होते अशी नोंद स्ट्रॅबो ह्या इतिहासकाराने केली आहे. शिकंदराच्या स्वारीच्या वेळी बॉसिलियस उर्फ टॉक्सिलिज नावाचा राजा इथे राज्य करीत होता त्याने व त्याचा मुलगा आंभी ह्यांनी शिकंदराशी सन्माननीय स्नेहसंबंध राखले होते. पण पुढे चंद्रगुप्त मौर्याने शिकंदरच्या सैनिक प्रतिनिधीचा पराभव करून तक्षशिलेवर आपला अंमल प्रस्थापित केला. चंद्रगुप्त मौर्यानंतर, बिंदुसार, सुसीम, अशोक आणि कुणाल या त्याच्या वंशजानी तक्षशिलेवर राज्य केले. मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर अनुक्रमे बॅक्ट्रीयन, शक आणि कुशाण ह्यांनी तक्षशिलेवर राज्य केले. ह्या शक-कुशाणांच्या काळातच ह्या ऐतिहासिक नगराची व येथील विद्याकेंद्राची अवनती सुरु झाली आणि पुढे हूण टोळ्यांनी तक्षशिलेचा विध्वंस केला.

एवढ्या निरनिराळ्या राजघराण्यांनी राज्य करूनही तक्षशीला विद्यापीठ सुमारे १२०० वर्षे विद्यादानाचे कार्य अविरतपणे करीत होते. प्रत्येक विद्यापीठाची काही वैशिष्ट्ये असत. तक्षशिलेचे वैशिष्ट्य हे की कोणत्याही विद्यार्थ्याला केवळ गरिबीमुळे प्रवेश नाकारला जात नसे. सर्वसाधारणपणे सर्व शिक्षणक्रमाबद्दल एक हजार सुवर्णनाणी एवढे शुल्क असे व ते शुल्क आगाऊ लागे पण ज्या विद्यार्थ्यांची एवढी रक्कम भरण्याची ऐपत नसे अशा गरीब विद्यार्थ्यांना हे शुल्क माफ असे एवढेच नव्हे तर अशा गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण संपल्यावर स्वगृही परतण्यासाठी वाटखर्चाला पुरेल इतकी रक्कम देण्यात येई. विद्वत्तेकरिता प्रसिद्ध असलेल्या काशीसारख्या प्रसिद्ध ठिकाणाहून सुद्धा राजपुत्र, श्रेष्ठीपुत्र कित्येक शेकडो मैलांवरून चालत तक्षशिलेला येत असत. केवळ हिंदुस्थानातूनच नव्हे तर आशिया, युरोपमधील पार्थिया, मिडिया, पर्शिया, उत्तर बॅक्ट्रिया, मेसापोटेमिया, ग्रीस, चीन व अरबस्थान ह्या देशातूनही अनेक विद्यार्थी विद्यार्जन करण्यास येत असत. गरीब विद्यार्थ्यांना केवळ विद्या शुल्कच माफ असे. असे नाही तर त्यांना अन्न, वस्त्र व औषधपाणीसुद्धा मोफत असे. अर्थात हे गरीब विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर ह्या ना त्या प्रकारे विद्यापीठास मदत करून शिक्षणाचे ऋण फेडून टाकीत असत. काही वेळेला गुरूंची खासगी सेवा करून रात्री अध्ययन करीत असत. गरीब-श्रीमंत सर्व विद्यार्थ्यांना सारखेच वागवण्यात येई. त्यामुळे उच्चनीचता पक्षपातीपणा असा कोणताही दुजाभाव नसे.

उत्तम शिक्षणाकरिता तक्षशिला इ.स. पूर्व सातव्या शतकापासून किंबहुना त्या आधीपासूनच जगप्रसिद्ध झाले होते हे निश्चितच. इ.स. चौथ्या शतकानंतर हूण लोकांच्या रानटी आक्रमणामुळे तक्षशिला अस्तंगत पावले. मात्र पाचव्या शतकात चिनी प्रवासी फा-हायेन हा हिंदुस्थानात आला होता तेव्हा तक्षशिला शिक्षणसंस्था म्हणून त्याला दिसली नसावी कारण त्याने लिहिलेल्या प्रवासवर्णनावरून तत्कालिन भारतातील सामाजिक स्थितीवर प्रकाश पडत असला तरी त्याच्या प्रवासवर्णनात तक्षशिलेचा शिक्षणसंस्था संबंधाने कोणत्याही प्रकारचा उल्लेख आढळत नाही. मात्र फा-हायेन ह्याने तक्षशिलेस भेट दिली होती. त्याने तक्षशिलेचे पूर्वीचे जे वैभव ऐकले असावे त्यामुळेच त्याला तक्षशिलेला पहाण्याचे औत्सुक्य वाटले असावे.

तक्षशीला विद्यापीठ प्रामुख्याने उच्च शिक्षणासाठी प्रसिद्ध होते. निरनिराळ्या विषयावरील सूक्ष्म, सखोल अभ्यासावर विशेष भर दिला जाई. वैद्यक शिल्पकला युद्धकला या विषयांसाठी तक्षशीलेची ख्याती होती. या व्यतिरिक्त वेदत्रयी, व्याकरण, तत्त्वज्ञान, वास्तुशास्त्र, ज्योतिष, कृषिविज्ञान, फलज्योतिष, वाणिज्य, सांख्यिकी, विज्ञान, लेखाशास्त्र, संगीत, नृत्य, चित्रकला हे विषय देखील शिकविले जात. बाराशे वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात अनेक राजे आणि राजघराणी होऊन गेली. ह्या सर्वांचा तक्षशिलेवर येथील अभ्यासक्रमावर भाषेवर कमी-अधिक परिणाम झाला. इराणी व ग्रीक संस्कृतीचे अनेक विषय व संकल्पना शिक्षणक्रमात समाविष्ट झाल्या. ब्राह्मी लिपी ऐवजी खरोष्टी लिपीचा वापर अधिक होऊ लागला. ग्रीक तत्वज्ञानाचा येथील अभ्यासक्रमात समावेश झाला असावा असे अँपोलोनिअसच्या वृत्तांतावरून वाटते.

तक्षशिला विद्यापीठात शिक्षकांना बहुमान होता. प्रत्येक शिक्षक म्हणजे जणू स्वतंत्र संस्थाच. ह्या शिक्षकांना प्रौढ विद्यार्थीमदत करीत असत. एकेका शिक्षकाच्या हाताखाली सुमारे ५०० विद्यार्थी शिकत असत. विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा द्यावी लागे ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच प्रवेश मिळे. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतानाचे वय १६-१७ असे. एकूण शिक्षणाचा कालावधी ७ ते ८ वर्षांचा असे. भारतातील काशीप्रमाणेच बनारस, राजगृह, मिथिला, उज्जयिनी इत्यादी नगरांतून तसेच कुरु व कोसल राज्यातूनही विद्यार्थी येत. कोसलचा प्रसेनजीत राजा व जीवक राजपुत्र म्हणजेच बिंबीसाराचा अनौरस पुत्र ह्यांनी

सर्वसामान्यांची आयुष्ये ही चांगल्या गोष्टींनीच पोसली जातात-बेसील सिंग

येथेच विद्यार्जन केले असे मानले जाते. पाणिनी व कौटिल्य यांनीही येथेच विद्यार्जन केले व पुढे ते येथेच आचार्य म्हणजेच शिक्षक झाले. त्याशिवाय धौम्य ऋषी व आयुर्वेदाचार्य जीवक तसेच अर्थराजनिती शास्त्र निपुण चाणक्य आणि व्याकरणकर्ता पाणिनी इत्यादींचे उल्लेख अध्यापक म्हणून सापडतात.

तक्षशिला विद्यापीठात एकूण अठरा मुख्य विषय शिकविले जात. मुख्य विषयांचे उपविषयही अनेक असत. भरपूर व ऐच्छिक विषय असल्याने विद्यार्थ्यांना आवडीच्या विषयांचा अभ्यास करण्याची मुभा होती. जादूसारखे विषयही अभ्यासाला होते. कुणी कोणतेही विषय शिकण्याची मुभा असे त्यामुळेच जादू व युद्धविद्येसारखे विषय ब्राह्मण मुलेही शिकत असत. काशीच्या राजाचा पुरोहित त्याच्या मुलाचे नाव जोतिपाल होते . तो तक्षशिलेत धनुर्विद्या शिकला . यालाच पुढे काशीचा मुख्य सेनापती म्हणून नेमण्यात आले. साहित्य आणि कला ह्यांचा उत्तम संगम या विद्यापीठात साधण्यात आला होता. अठरा विषयांव्यतिरिक्त वेद व वेदान्त हे मुख्य धार्मिक विषय म्हणून शिकविण्यात येत. पाठांतराला खूप महत्त्व होते. वेद तर तोंडपाठ करुन घेण्यात येत असत. तत्कालिन जीवनाला उपयोगी पडणारे व इतर सर्वसाधारण विषय अभ्यासाला होते. उदा. हस्तिशिक्षा किंवा गजपरीक्षा, मृगया, धनुर्विद्या, आयुर्वेद किंवा वैद्यकीय ज्ञान, शिल्पकला. आज अभियांत्रिकी महाविद्यालयांतून जे विषय शिकविले जातात तसेच त्यावेळेही शिकविले जात. चित्रकला, मूर्ती बनविणे, हस्तव्यवसाय ह्या सर्व विषयांचे तात्विक (Theoratical) आणि प्रात्यक्षिक (Practical) असे शिक्षण दिले जात असे. तक्षशिलेमधील शिकविले जाणारे विषय येथील शिक्षक यांचा लौकिक सर्वदूर पसरला असावा असे वाटते त्यामुळेच शिकदराने तक्षशिलेहून खास पंडिताना आमंत्रित करून अगत्याने आपल्या देशात नेल्याचा उल्लेख आढळतो.

तक्षशिलेत अनेक विषय जरी शिकविले जात होते तरीसुद्धा वैद्यकशास्त्राचा सखोल संशोधनात्मक अभ्यास जितका तक्षशिलेत झाला तितका जगाच्या पाठीवर इतरत्र तत्कालीन विद्यापीठात झाला असेल असे वाटत नाही. जीवक नावाच्या प्रसिद्ध वैद्याचे चरित्र पाहिले तरी साक्ष पटते. जीवक हा बौद्धकालीन अत्यंत प्रसिद्ध वैद्य होता. त्याच्याबद्दलची माहिती विजयपिटकात आली आहे. जीवक हा वेश्यापुत्र होता. राजगृहाहून तो थेट तक्षशीलेला वैद्यकशास्त्राचा सखोल अभ्यास करण्याकरिता आला. ह्यावरून आणखी एक गोष्ट लक्षात येते ती ही की त्यावेळी सुद्धा ज्ञानाच्या क्षेत्रात वेश्यापुत्र अथवा राजपुत्र असा भेदभाव नव्हता. जो कोणी ज्ञानाचा इच्छुक असेल त्याला ज्ञान मिळविण्याचा हक्क होता. जीवक तक्षशीलेला तत्कालीन प्रसिद्ध आचार्यांकडे सात वर्षे राहिला. त्याने अपार निष्ठेने आणि कष्टाने वैद्यकशास्त्राचा सखोल अभ्यास केला त्यात तो इतका पारंगत झाला की मोठमोठ्या आचार्यांना, नामांकित वैद्यकांनाही जे रोग बरे करता येत नसत तेही तो बरे करू लागला. लहान मुलांच्या रोगांच्या बाबतीत तर तो कमालीचा निष्णात वैद्य होता. आधुनिक भाषेत इंग्रजीत ज्याला पेडिट्रेशीयन (Pediatrition) म्हणतात तसाच जीवक होता.

जीवक शल्यविशारदही होता. तो कुशलतेने शस्त्रक्रिया करी. त्याने एका प्रसिद्ध व्यापाऱ्याच्या डोक्यावर कुशलतेने शस्त्रक्रिया केल्याचे विनयविरकात म्हटलेले आहे. त्याने खुद्द बुद्धदेव, राजा चण्डप्रद्योत, राजा बिंबीसार याना भयंकर दुखण्यातून बरे केले. त्याची कीर्ति सर्वदूर पसरली होती. श्रावस्तीपासून ते उज्जयिनीपर्यंत तो प्रत्यक्ष वैद्यकी करायचा. मगध देशाचा राजा बिंबीसार याने आपला मुख्य वैद्य म्हणून याची नेमणूक केली होती.

जीवकाने आपल्या गुरुंकडे सात वर्षे शिक्षण घेतले व त्याला वाटू लागले की ह्या शास्त्रातील आपले बरेचसे शिक्षण पूर्ण झाले आहे. आपल्या गुरुने आपली परीक्षा आता घ्यावी. आधुनिक काळाप्रमाणे त्याकाळी परीक्षेची

तारीख मुक्रर केलेली नसे. गुरुंना जेव्हा वाटे की आपल्या शिष्याचे शिक्षण पूर्ण झाले आहे तेंव्हा ते स्वतःहून परीक्षा घेत त्यात तो शिष्य जर उत्तीर्ण झाला तर गुरु त्याला पुढचा उपदेश करीत व शिक्षणातून मुक्तता करीत. साधारणपणे असा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी एकतर गृहस्थाश्रमी जात असे वा आचार्य होत असे. जीवकाला मात्र त्याच्या गुरुंनी मुक्त केलेले नसल्याने त्याला मनापासून वाटू लागले की आपण आता परीक्षा द्यायला लायक झालेलो असल्याने गुरुंनी आपली परीक्षा घ्यावी. एके दिवशी गुरुंनी त्याला सांगितले की तक्षशिलेच्या सभोवताली एक योजनेच्या आत फिरुन औषधी गुण नसलेल्या वनस्पती घेऊन ये. बिचारा जीवक तत्कालिन साधने घेऊन बाहेर पडला. तो खूप फिरला एकेका छोट्या मोठ्या वनस्पतींचे तो निरिक्षण करायला लागला. कित्येक वनस्पतींच्या खोडामध्ये त्याला औषधी गुण आढळले. काहींच्या पानांमधे, फुलांमधे, काहींच्या फळांमधे औषधी गुण आढळले तर, काहींच्या मूळांमध्ये त्याला औषधी गुण सापडले. काही वनस्पतींचं अस्तित्वच मानवी जीवनास आरोग्यपूर्ण म्हणजेच एकप्रकारे वनस्पतींचं निव्वळ अस्तित्व सुद्धा औषधी गुणदर्शक असे आढळल्यावर व सर्व वनस्पतींचे अनेक वेळा निरिक्षण करून झाल्यावर निराश होऊन तो परतला व गुरुंना म्हणाला की मला एकही वनस्पती अशी आढळली नाही की जिच्यात औषधी गुण नाही. तेव्हा त्याच्या गुरुंनी त्याला तू उत्तीर्ण झालास म्हणून सांगितले. तसेच त्याला घरी जाण्यास अनुमती दिली व घरी जाताना वाटखर्चाला लागतील एवढी पैसेही दिले. जीवक तक्षशिलेहून राजगृह नगरीस परतला येताना अनेकांवर तो उपचार करीत आला. त्याची कीर्ती त्यामुळे सर्वत्र पसरत चालली. पुढे जीवकाने संशोधन करून 'जीवकसंहिता' मांडली की जी आयुर्वेदात महत्वाची मानली गेली.

वैद्यकशास्त्राप्रमाणेच तक्षशिला युद्धकलेच्या शिक्षणाकरिता प्रसिद्ध होते. अनेक राजपुत्र हजारो मैल प्रवास करून तक्षशिलेत युद्धशिक्षणाकरिता दाखल होत. एकदा तर अनेक राष्ट्रांतून केवळ धनुर्विद्या शिकण्याकरिता एकशे तीन राजपुत्र आल्याचा उल्लेख जातकात आहे.

वैद्यकशास्त्र, युद्धकलाशास्त्र ह्या प्रमाणेच स्थापत्य व शिल्पकला याकरिता तक्षशीला प्रसिद्ध होते. शिकंदराच्या लढाईनंतर ग्रीक कलेचा या विद्यापीठाशी संबंध आला. ग्रीक नमुन्याप्रमाणे बुद्धाचे अत्यंत देखणे पुतळे येथे तयार करण्यात येऊ लागले. स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून तक्षशिला येथील 'सूर्यमंदिराचा' उल्लेख ग्रीक इतिहासकारांनी केला.

तक्षशिलेत अभ्यास संपल्यावर विद्यार्थी आपआपल्या घरी जात. हजारो मैलांचे अंतर तुडवून हे विद्यार्थी विद्यापीठात शिक्षणाकरिता आलेले असत व यशस्वीपणे शिक्षण पूर्ण करून पुन्हा एवढा प्रदीर्घ प्रवास करून घरी परतत तेव्हा आईवडील व नातेवाईकांना अत्यानंद होणे अगदी नैसर्गिक असे. आजच्या काळात घरातल्या घरात राहून छोटी मोठी परीक्षा पास झाल्यावरसुद्धा विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येते. सत्यनारायणाची पूजा घातली जाते. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. त्यानिमित्ताने मिठाई, पेढे वाटले जातात. त्यावेळी तर काही वर्षे घरापासून दूर गेलेला आपला मुलगा सर्व संकटांवर मात करून यशस्वी होऊन परत आल्यावर सर्व जवळच्या लोकांना आनंद वाटणे अगदी नैसर्गिक होते. त्यामुळे अशा वेळी खूप मोठा उत्सव साजरा केला जाई. एकप्रकारे विद्येचा बहुमान करण्याची पद्धत त्याकाळी सुद्धा अस्तित्वात होती.

तक्षशिलेला बहुमानाचे स्थान मिळवून देण्यात तेथील शिक्षकांचा निःसंशय सहभाग होता यात वाद नाही. या शिक्षकांची फारशी नावे उपलब्ध नसली तरी ॲरिस्टोटेलस, सिसेरो, प्लिनी इत्यादि पाश्चात्य पंडितांनी या शिक्षकांबद्दलची मुक्तकंठाने स्तुती केलेली आढळते.

इसवी सनाच्या आधी सहाव्या शतकापासून

तक्षशीला विद्यापीठ अत्यंत प्रसिद्धीस आले. हे विद्यापीठ म्हणजे तत्कालीन विश्वविद्यालय होते. त्या आधी तक्षशिलेच्या तोडीची एकही शिक्षणसंस्था पश्चिम आशिया किंवा पूर्व यूरोपामध्ये अस्तित्वात असल्याची नोंद सापडत नाही. पाश्चात्य जगतात नावारुपाला आलेले 'अॅलकुझॉन्ड्रिया म्युझियम' नावाने ओळखले जाणारे विद्यापीठ हे त्यानंतरच्या काळातले. त्याचा कालावधीसुद्धा जेमतेम शंभर वर्षांचा. साफोक्लक्स, हिरोडोटस्, एस्चिलस, यूरिपिडीज, सॉक्रेटीस, प्लेटो, अॅरिस्टॉटल हे सर्व पाश्चात्य पंडीत हे तक्षशीलेच्या स्थापनेनंतरचे आहेत. ह्याचाच अर्थ प्राचीन भारतातील ज्ञानसाधना ही श्रेष्ठ आणि आद्य ज्ञानसाधना होती ह्यात संशय नाही.

एकंदर इतिहासाचे अवलोकन करता तक्षशीला विद्यापीठ हे त्या काळात अद्ययावत आणि अद्वितीय असे विद्यापीठ होते. पण पुढे अनेक वैभवशाली विद्यापीठांच्या कपाळी जसे दुर्दैव आले तसेच तक्षशीलेच्या वाट्यालाही आले. शिकंदरच्या काळात हूण लोकांच्या टोळ्या निरनिराळ्या प्रदेशात आक्रमण करीत. या टोळ्या म्हणजे ते सैन्य असे आक्रमण करून अमानुष लुटालूट करण्यात ह्या टोळ्या प्रसिद्ध होत्या. त्यांच्या भयकारी आक्रमणांना भिऊन चीनने देशाभोवती एक प्रचंड भिंत बांधली ही भिंत येवढी प्रचंड की जगात तशी प्रचंड भिंत बांधली गेली नाही. आज ती भिंत जगातील नऊ आश्चर्यांपैकी एक होऊन बसली आहे. या अभेद्य भिंतीमुळे चीनचे संरक्षण झाले पण ह्या टोळ्या पश्चिमेकडे व भारताकडे वळल्या त्यांनी तक्षशीलेवर स्वारी केली. ही जी प्रचंड स्वारी तक्षशीलेवर झाली ती इ.स.च्या साडेचारशे ते पांचशेच्या सुमारास झाली. ह्या स्वारीमुळे तक्षशीला उध्वस्त झाले. तक्षशीला नगरी आणि तेथील विद्यापीठ लयाला गेले. सतत सुमारे बाराशे वर्षे अखंड तेवणारा हा ज्ञानाचा नंदादीप विझला. जरी हा ज्ञानाचा नंदादीप विझला असला तरी तक्षशीलेची कीर्तिध्वजा आजही जगाच्या कानाकोपऱ्यात फडकते आहे. जगाच्या अंतापर्यंत ही कीर्तिध्वज अशीच डौलाने फडकत रहाणार आहे.

डॉ. प्रकाश ग. करमरकर

ग्रंथपाल, वझे महाविद्यालय,
मुलुंड(पूर्व) मुंबई
दूरध्वनी: ५६१ २८७१

• • •

With Best Compliments from

Sunil K. Doshi

**Smart Capital Consultants**

A-301, Kukreja Palace,
Vallabh Baug Lane Extn.,
Ghatkopar (E), Mumbai 400 075

# भाषांतर प्रक्रिया

प्रा. प्रदीप कर्णिक

*भाषांतर प्रक्रियेत ग्रंथालयाचे योगदान महत्त्वाचे होते व आहे. या प्रक्रियेबद्दल विचार मांडणारा हा लेख- संपादक*

भाषांतराची प्रक्रिया सर्वत्र चालू असते. ती ज्ञानाच्या आदान-प्रदान अवस्थेत अत्यंत महत्त्वाची ठरते. जगभर सर्वत्र भाषांतर करणे गरजेचे मानले गेले असावे. प्राचीन काळी तर भाषांतराची प्रक्रिया ग्रंथालयात होत असे. ग्रंथालयाचे ते एक महत्त्वाचे कार्यच मानले गेले होते. अनेकांनी भाषांतरे केली आहेत. अनेकांना भाषांतर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे.

श्री. ना.बा. मराठे यांनी 'भारतीय ग्रंथालयांचा इतिहास' हे पुस्तक लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी प्राचीन ग्रंथालये कशी होती, त्यामध्ये कोणत्या प्रकारची कामे चालत, कोणते व किती ग्रंथ होते या सर्वांविषयी लिहिले आहे. त्यावरून आपल्याला भाषांतराचे जे काम चालत असे त्याची ओळख होऊ शकते.

''अलीकडच्या उत्खननात प्राचीन काळातील शहरांचे जे अवशेष सापडले त्यावरून जगातील सर्वात प्राचीन ग्रंथालये सुमेरियन व बॅबिलोनियन संस्कृतीच्या काळात अस्तित्वात होती. ॲसिरियन राजघराणे बॅबिलोनियन संस्कृतीच्या काळात अस्तित्वात होते. असुरबनिपाल (इ.स.पू. ६२८ ते ६२७) या राजाने निनेव्ह येथील एका मंदिराजवळ एक मोठे ग्रंथालय स्थापन केले होते. बॉर्सिया येथील ग्रंथालयातील ग्रंथांच्या नकला त्याने करवून घेतल्या, अनेकांची भाषांतरे केली व सुमेरियन भाषेतील सुमारे २० हजार ग्रंथ एकत्रित केले.

प्राचीन ईजिप्तची वाढ सुमेरियन, बॅबिलोनियन व ॲसिरियन संस्कृतीच्या समकालीन होती. ईजिप्तमधील सर्वात महत्त्वाचे ग्रंथालय ॲलेक्झांड्रिया येथे होते. ग्रीक राजा पहिला टॉलेमी याने इ.स.पू. २९० मध्ये ते स्थापन केले. डॅमीट्रिअस, झिनॉडोटस, अपोलोनियस, ॲरिस्टोफेनीस, आदी नामवंत विद्वानांनी या ग्रंथालयाचे ग्रंथपालपद भूषविले. त्यांनी अनेक ग्रंथ जमविले, त्यांची भाषांतरे केली व १२० विषयांत वर्गीकरण करुन सूचीही प्रसिद्ध केली.

जगभर ही दृष्टी दिसून येते. आपली संस्कृत ही सगळ्या जगाची प्रथम ज्ञानदात्री भाषा आहे. अतिप्राचीन काळापासून चिनी, जपानी, भोट इ. पौर्वात्य व त्यानंतर अरेबिक, फारसी, ग्रीक, जर्मन, इंग्रजी इत्यादी विविध पाश्चात्य भाषांमध्ये संस्कृत ग्रंथांची भरपूर भाषांतरे झालेली आहेत. परंतु ही भाषांतराची प्रक्रिया निरंतर एकतर्फी राहिली. देशोदेशीच्या पंडितांनी प्राचीन काळी जसे संस्कृत ग्रंथांचे अनुवाद केले, तसे त्या काळातील संस्कृत पंडितांनी अन्य भाषीय ग्रंथांचे संस्कृत अनुवाद करण्याचा प्रयत्न कधीही केलेला दिसत नाही. चिनी भाषेत अनेक भाषांतरे झालेली दिसून येतात. या संदर्भात डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशात अधिक तपशील आढळतो.

''चिनी बौद्ध तिपिटकाच्या प्रथम व द्वितीय परिशिष्टांत अनुक्रमे ज्या भारतीय ग्रंथकारांच्या ग्रंथांची चिनीत भाषांतरे झाली आहेत व ज्या भारतीय ग्रंथकारांची चिनी भाषेत भाषांतरे केली आहेत अशा दोन्ही प्रकारच्या ग्रंथकारांची व भाषांतरकारांची यादी दिली आहे. ज्या भारतीय ग्रंथकारांच्या ग्रंथांची चिनी भाषेत भाषांतरे झाली त्यांपैकी फक्त मुख्य मुख्य व प्रसिद्ध ग्रंथकारांचाच या

यादीमध्ये समावेश केला आहे. या खेरीज दुय्यम प्रतीच्या कित्येक ग्रंथकारांची नावे आपणास विस्मृतीमुळे अगर संशोधनाच्या अभावी अज्ञात असण्याचा संभव आहे. या यादी वरून आपणास मुख्य १३ भारतीय ग्रंथकारांची नावे उपलब्ध होतात व त्यांच्या एकंदर १०४ ग्रंथांची चिनी भाषेत भाषांतरे झाली होती, एवढी माहिती मिळते. त्याप्रमाणेच दुसऱ्या यादीवरून बौद्ध संप्रदायाचा मुख्य ग्रंथ जो तिपिटक त्याची भाषांतरे भारतीय ग्रंथकारांनी चिनी भाषेत केल्याबद्दलची माहिती मिळते. ज्या देशांत आपल्या संप्रदायाचा प्रसार करावयाचा त्या देशातील लोकांस आपली सांप्रदायिक तत्त्वे कळण्यासाठी व आपला संप्रदाय तेथे दृढमूल होण्यासाठी त्या देशाच्या भाषेत आपले सांप्रदायिक मुख्य ग्रंथ असणे अत्यावश्यक असते. कोणताही संप्रदाय एखाद्या देशात चिरकालीन टिकण्यासाठी त्या देशांतील देश्य भाषेत त्या संप्रदायाचे वाङ्मय तयार होणे फार जरूरीचे असते. या दृष्टीने अनेक ग्रंथकारांनी तिपिटकाची चिनी भाषेत भाषांतरे केली व तन्मूलक वाङ्मयाचा पाया घालून दिला. अशा ग्रंथकारांपैकी प्रमुख भारतीय ग्रंथकारांची संख्या ७५ असून त्यांनी ६७५हून अधिक ग्रंथरचना केली असे आपणास आढळून येते.

**ज्यांच्या ग्रंथांची चिनीभाषेत भाषांतरे झाली आहेत अशा मुख्य भारतीय ग्रंथकारांची यादी**

| | ग्रंथकाराचे नाव | भाषांतर झालेल्या ग्रंथांची संख्या |
|---|---|---|
| १ | मैत्रेय | १० |
| २ | अश्वघोष | ७ |
| ३ | नागार्जुन | २४ |
| ४ | देव. हा दक्षिण हिंदुस्थानचा रहिवाशी, व नागार्जुनाचा शिष्य; याला नीलनेत्र असेही म्हणतात, परंतु याचे मूळ नाव चंद्रकीर्ति असे होते. | ९ |
| ५ | वसुबंधु | ३६ |
| ६ | स्थिरमति, नालंदा येथील एक विद्वान | ३ |
| ७ | स्थितमति, जयसेनाचा (?) गुरु | ३ |
| ८ | देवशर्मा, बुद्ध निर्वाणपदाप्रत गेल्यानंतर १०० वर्षेपर्यंत हा जिवंत होता असे म्हणतात. | १ |
| ९ | वसुमित्र, कनिष्कराजाने बोलाविलेल्या ५०० अर्हतांत हा प्रमुख होता. | ७ |
| १० | समंतभद्र, हा योगाचार्य होता (बोधिहृदय शीलादनकल्प ग्रंथाचा कर्ता) | १ |
| ११ | शिलादित्यराजा | १ |
| १२ | कपिल ऋषि, सांख्यवादाचा जनक. (सांख्यकारिकेचा कर्ता) | १ |
| १३ | ज्ञानचंद्र, वैशेषिक तत्त्वज्ञानाचा गुरु | १ |

**चिनी भाषेत बौद्ध तिपिटकांचे भाषांतर करणारे भारतीय भाषांतरकार**

| | | |
|---|---|---|
| १ | काश्यप मातंग | : मध्यहिंदुस्थानातील ब्राह्मण श्रमण, चिनी वकील त्साई यिन (Tsai Yin) इ.स. ६५ याच्या निमंत्रणावरून हा इ.स ६७ साली चीनमध्ये गेला, त्याच वर्षी त्याने लोयान (Lo-Yan) येथील मठात एका सूत्राचे भाषांतर केले; व थोड्याच दिवसात तेथे तो मरण पावला. |
| २ | कूफालान | : फालानचा अर्थ धर्मरस असा असावा, परंतु कु-फा-ला न ह्याला तिबेटी लोक गोवर्धन किंवा भरण |

जे तुम्ही अर्पण कराल ते तुमचे, जे तुम्ही राखून ठेवला ते तुमचे नाही -नानक

| | | | |
|---|---|---|---|
| | | | असे म्हणत असावेत. हा काश्यपाच्या मागून गुप्तपणे चीनमध्ये गेला; व दोघांनी मिळून ४२ परिच्छेदांच्या सूत्राचे भाषांतर केले. |
| ३ | लोकरक्ष | : | श्रमण. हा इ.स. १४७ त चीनमध्ये गेला व इ.स. १८६ पर्यंत लोयान येथे भाषांतर करण्यात गुंतला. |
| ४ | शाक्य | : | श्रमण. इ.स. २०७ |
| ५ | धर्मकाल | : | श्रमण. इ.स. २२२ इ.स. २५० साली महासंघिकांच्या प्रतिमोक्षाचे भाषांतर केले. चिनी भाषेत विनयपिटकाचे हे पहिलेच पुस्तक होय. |
| ६ | खान सान हवुई | : | वू राजाच्या राजधानीत तो इ.स. २४७ या वर्षी आला. त्याने इ.स. २५१ ते इ.स. २८० पर्यंत भाषांतराचे काम केले. |
| ७ | कालरुचि | : | श्रमण. इ.स. २८१ त्याने एका सूत्राचे भाषांतर केले. |
| ८ | श्रीमित्र | : | त्याने इ.स. ३०७-३१२ या वर्षी नानकिंग येथे ३ ग्रंथांची भाषांतरे केली. |
| ९ | धर्मरक्ष | : | श्रमण. याने इ.स. ३८१-३९५ या वर्षी कित्येक ग्रंथांची भाषांतरे केली. |
| १० | गौतमसंघदेव | : | याने ७ ग्रंथांची भाषांतरे केली. |
| ११ | बुद्धभद्र | : | याने १३ किंवा १५ ग्रंथांचे भाषांतर केले. इ.स. ४२९त मरण पावला. |
| १२ | धर्मप्रिय | : | इ.स. ४०० मध्ये 'विनयासंबंधी मिश्र प्रश्न' या ग्रंथाचे भाषांतर केले. |

इत्यादी ७५ जणांनी परप्रातांत जाऊन परभाषेत भाषांतरे केली. परंतु संस्कृत ग्रंथांत चिनी, तिबेटी वा अन्य ग्रंथांची भाषांतरे केली नाहीत याचा अचंबा वाटून राहतो. असे का व्हावे कोण जाणे ?

अशीच परंपरा आपल्याकडील प्राचीन वेगवेगळ्या विद्यापीठातही दिसून येते.

प्राचीन भारतातील ग्रंथसंग्रहाच्या बाबतीत नालंदा विद्यापीठाचा (इ.स. ४५० ते १२१०) ग्रंथभांडार हा प्राण समजला जाई. या भांडारात नाना विषयांवरील शेकडो ग्रंथांची हस्तलिखिते ठेवलेली होती. नवीन नवीन ग्रंथांचे लेखनही केले जाई. नंतर त्याच्या नकला करण्याचे काम केले जाऊन त्याच्या प्रति तयार करण्यात येत असत. इत्सिंग व ह्युएनत्संग येथेच अनुक्रमे दहा वर्षे व सात वर्षे विद्यार्थी म्हणून राहिले. एकट्या इत्सिंगनेच येथील ४०० संस्कृत ग्रंथांचा चिनीभाषेत अनुवाद करून नेला, असे त्याने स्वतः लिहून ठेवले आहे.

विक्रमशीला विहार (इ.स. ८वे ते १२वे शतक) हे जवळ जवळ ४०० वर्षे बुद्धभिक्षूंचे विद्याकेंद्र म्हणून गाजले. केवळ भारतातच नव्हे तर तिबेटमधूनही येथे अध्ययनासाठी विद्यार्थी येत. बुद्धसानपार, विरोचनरक्षित, जेतारि, रत्नाकरशांती, ज्ञानश्रीमित्र, रत्नवज्र असे कित्येक बुद्धधर्मीय पंडित येते होते. त्यांनी या केंद्रातून लिहिलेले मूळ संस्कृत

ग्रंथ तिबेटी भाषेत भाषांतरित केलेले सध्या तिबेटमधील बौद्धमठांतून सापडतात.

नालंदा विद्यापीठाप्रमाणेच सोमापुरी विहारात (इ.स. ८वे ते ११वे शतक) भव्य पोथीघर होते. याचा मुख्य रक्षक होता आतिश दिपंकर. याने 'माध्यमक रत्नदीप' या भावविवेकाचा ग्रंथ तिबेट भाषेत अनुवादित केला होता.

एकाहून एक निष्णात पंडित जगद्दल विहारात होते. (इ.स. ११वे ते १२वे शतक) दानशील पंडिताने तर 'पुस्तक पाठोपायः' नावाचे एक पुस्तक लिहिले होते. मूळ ग्रंथ जरी आज मिळत नसला तरी त्याचा तिबेटी अनुवाद उपलब्ध आहे.

मध्ययुगीन ग्रंथालयांचा अभ्यास करतानाही काही अनुवाद प्रक्रियेचा प्रत्यय येतो.

नागरकोटमधील ज्वालामुखी मंदिरात १३०० पुस्तकांचा संग्रह जमला होता. फिरोझशहाने नागरकोट आपल्या ताब्यात आल्यावर त्यातील काही पुस्तकांचा फारसी मध्ये अनुवाद करण्यास फर्मावले होते. राजाज्ञेवरून इझेदुद्दिन खलीदखान या सरकारी कवीकडून एका भौतिकशास्त्राचा अनुवाद करून घेऊन फिरोझशहाने त्या पुस्तकाचे नाव 'इलाली-फिरूझशाही' असे ठेवले.

फिरोझ शहा इ.स. १३८८ मध्ये मरण पावला. त्याच्या पश्चात शिकंदर लोदी गादीवर आला. यालाही वाङमयीन अभिरूची होती. तो स्वतः कविता लिही. त्यामुळे त्याच्या दरबारात बरीच बिगर इस्लामी विद्वान मंडळी जमा झाली होती. 'तिब्-इ-सिकंदर' नावाचा ग्रंथ मिया भावा (Main Bhawa) याने वैद्यकाच्या मूळ संस्कृत वरून भाषांतरित केला.

याच काळात संस्कृत, तत्त्वज्ञान, गणित, वैद्यक व इतर कलात्मक ग्रंथांची पर्शियनमध्ये भाषांतरे करण्याचा जणू सपाटाच चालला होता. मूळ संस्कृत ग्रंथांचे नाव शोधून काढून या काळात कोणकोणत्या संस्कृत ग्रंथांची पर्शियन, अरेबिक भाषांतरे झाली हे पहाणे हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

शिकंदर लोदीने दिलेल्या या उत्तेजनामुळे ठिकठिकाणी लहान मोठी ग्रंथालये दिसू लागली. या अनुवादकांमध्ये केवळ मुस्लिम नव्हते तर बरेच हिंदु पंडितही होते.

मोगल काळातील औरंगजेब सोडल्यास इतरांनी संस्कृतमधील तत्त्वज्ञान, वैद्यक, ज्योतिष वगैरे विषयांवरील ग्रंथांची पर्शियन, अरेबिक भाषेत अनुवाद करून घेण्यास प्रोत्साहन दिले.

अकबराने जेथे जेथे स्वाऱ्या केल्या त्या ठिकाणच्या राजांचे वा सरदारांचे ग्रंथसंग्रह जप्त करून आपल्याबरोबर आणण्यास तो विसरत नसे. या कालखंडात कित्येक संस्कृत ग्रंथांची पर्शियन भाषेत भाषांतरे झाली. महाभारताचे नकीबखान, बदौनीचे मौलाना अब्दुल कादीर व ठाणेश्वरचा शेख सुलतान यांनी पद्यमय पर्शियन भाषांतर केले होते. 'रज्मनामा' म्हणजे युद्ध कथा या नावाने ओळखले जात होते. बदौनीच्या मौलाना अब्दुल कादीरने चार वर्षे खपून रामायणाचाही पर्शियन अनुवाद केला होता. (इ.स. १५८९) हाजी इब्राहिम सिर्हिंद याने अथर्ववेदाचाही अनुवाद केला होता. फैझीने लीलावती या भास्कराचार्यांच्या ज्योतिर्गणित विषयक ग्रंथाचा अनुवाद केला होता. कल्हणाच्या राजतरंगिणीचाही अनुवाद शाह महंमद या शहाबादच्या मौलानासाहेबांनी केला होता. शिवाय जलदमनकालिया मर्दन वगैरेसारखे कित्येक फुटकळ ग्रंथ भाषांतरित केले गेले.

मोगल घराणे विद्याप्रेमी असल्याने तख्तावर त्यांच्यापैकी कोणी का बादशहा म्हणून येईना ग्रंथांवरील त्यांचे प्रेम कमी होत नसे. जहांगीरनंतर शहाजहाँ आला तरी तो ही विद्याप्रेमी होता. विविध ग्रंथकारांनी त्याला

---

मधाच्या पोळ्यात राहून कधीही मध निर्माण करता येत नाही.

आपले ग्रंथ अर्पण केले होते. त्याची यादी बरीच मोठी भरेल. त्याचा ज्येष्ठ मुलगा दारासुको हा तर स्वतः संस्कृत जाणणारा होता. त्याने उपनिषदांच्या स्वतः केलेल्या पर्शियन भाषांतराचे इंग्रजी भाषांतर आता उपलब्ध आहे.

यावरून आपण असे म्हणू शकतो की आपल्याकडे भाषांतर करण्याची वृत्ती दिसून येत नाही. स्थिती फक्त मराठी वाङ्मयापुरतीच आहे असे नाही तर संस्कृत साहित्याचा इतिहास पाहिला तर तेथेही अशीच अवस्था दिसून येते. हा भाषांतरित साहित्याचा स्वतंत्र प्रकार संस्कृत वाङ्मयात अर्वाचीन काळात उदयास आलेला दिसून येतो.

मग प्रश्न निर्माण होतो की भाषांतर न केले जाण्यामागची कारण मीमांसा काय असू शकेल ? याचा शोध घेणे गरजेचे ठरते. हा शोध मराठी व संस्कृत पुरताच मर्यादित आहे.

१. एकंदर मराठी ग्रंथनिर्मितीच्या इतिहासात, एखाद दुसरा अपवाद वगळल्यास कागद हेच ग्रंथ निर्मितीचे एकमेव साधन असल्याचे दिसून येते. शिला, वस्त्र, ताडपत्र ह्यांचे वरील अपवाद वगळल्यास मराठी ग्रंथ निर्मिती प्रारंभापासून कागदावरच झालेली दिसते. कागद ही वस्तू महाराष्ट्रात मुसलमानांच्या संपर्काने आली असे काहीजण मानतात. मुद्रणपूर्व काळात हस्तलिखित पोथ्यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने त्या तयार करणे हा एक स्वतंत्र व्यवसाय होता. यामुळे प्रत संग्रही ठेवण्याची वृत्तीही नंतरच आली असावी. जर प्रत संग्रही ठेवण्याची वृत्तीच नंतर आली तर भाषांतराचे काम दूरच राहिले.

२. ग्रंथ प्रसार कागद येण्या आधी श्रवणद्वारे होत असे. किंबहुना ग्रंथ वाचण्यासाठी नसून मुख्यतः श्रवणासाठीच असत. एकजण पोथी वाचीत असे व इतर अनेक श्रोते त्याचा आस्वाद घेत असत. 'पेशवे दप्तरा'त अमुक अमुक ग्रंथ श्रवणाकरिता आणला असे उल्लेख आढळतात. 'पोथी लावण्याची' परंपराही आपल्याकडे होती. अजूनही खेड्यात रामविजय, हरिविजय, भावार्थरामायण इत्यादी ग्रंथांच्या पोथ्या 'लावण्याची' परंपरा आढळून येते. या श्रवणाच्या ग्रंथवाचून घेणे व ऐकण्यावर समाधान मानल्यामुळे भाषांतर करण्याकडे दुर्लक्ष झाले असण्याची दाट शक्यता आहे.

३. ज्या लोकांना इतर भाषांचे ज्ञान होते, त्यांनी आपले वाङ्मय इतर भाषांमध्ये नेण्याचे कार्य केले. परंतु इतर भाषेतील वाङ्मय आपल्या भाषेत आणले नाही. याची अनेक कारणे असू शकतील. प्रथम म्हणजे बुद्ध धर्माचा प्रसार व्हावा या प्रेरणेने चिनी वा तिबेटी भाषेत भाषांतरे झालेली दिसून येतात. सम्राट अशोकाचा पुरस्कार मिळाल्याने तर ते अधिकच झाले असावे. दुसरे असे की राजाज्ञा झाल्याने आपली वाङ्मय दुसऱ्या भाषेत गेले असावे. परंतु इतर भाषेतील वाङ्मय दुसऱ्या भाषेत येण्यासाठी कोणत्याही प्रकारे राजाश्रय मिळाला नसावा. तिसरे असे की अन्य भाषांमध्ये संस्कृतच्या तोडीचे वाङ्मय उपलब्ध नसावे. आणि ज्या संस्कृतीत संस्कृतपेक्षा श्रेष्ठ असे वाङ्मय निर्माण झाले होते ते सारे वाङ्मय आपल्या संपर्कात आले नसावे.

४. संस्कृत भाषा सोडून अन्य देशी भाषांकडे पहाण्याचा दृष्टीकोनही अत्यंत दूषित असा होता. यामुळे भाषांतर कर्त्याला योग्य तो मान व सन्मान दिला गेला नाही. किंबहुना संस्कृतविषयीचा दुराभिमान खूप जाज्वल्य असा होता. संस्कृत सोडून अन्य भाषेत बोलणे अपमान समजला जाई. इतर सर्व भाषा म्लेच्छांच्या, त्या भाषेत काय सांगायचे असा भाव सर्वत्र होतो.

श्री. शं. बा. जोशी यांनी ब्राह्मणांच्या या वृत्तीचे दिग्दर्शन 'मऱ्हाठी संस्कृती' मध्ये लिहिले आहे. 'ब्राह्मण देशस्थ' होईपर्यंत त्याला कोणत्याही देशी भाषेचा विशेष अभिमान नव्हता. वैदिक परंपरा, गीर्वाण वाणी संस्कृत यांचाच काय तो पुरस्कार ते करीत. तिच्याच सेवेत ते यावज्जीव धन्यता मानीत असत. प्राण गेला तरी बेहत्तर पण

प्राकृत भाषेचा उपयोग म्हणून करू नये. अशा तऱ्हेची कडवी वृत्ती एकेकाळी ब्राह्मण वर्गात होती. 'प्राकृतं म्लेंच्छभाषितम्। तं श्रोतव्यं द्विजेनेतद....अधोनयति तत् द्विजम्' गरुड पुराणातील हे विधान ब्राह्मण वर्गाचा मनोभाव प्राकृत वगैरे संस्कृतेतर भाषांविषयी कशा प्रकारचा होता हे यथार्थतेने व्यक्त करते.''

संस्कृत नाटकात राजे व उच्च दर्जाचे लोक यासाठी संस्कृत व स्त्रियांसाठी आणि इतर सामान्य लोक यासाठी प्राकृत किंवा बोली भाषा याची योजना केलेली आहे. यावरून हे सिद्ध होते की इतर भाषेचा वापर श्रेष्ठ व्यक्ती करणार नाही. यामुळे भाषांतरातून लिहिण्या बोलण्या ऐवजी संस्कृतामधून बोलणे लिहिणे उच्च गणले गेले. म्हणूनच भाषांतर ही प्रक्रिया फारच कमी प्रमाणात दिसून येते.

हे जरी सर्व खरे असले तरी भाषांतर प्रक्रियेशी समांतर अशी एक वाटचाल मराठीत अस्तित्वात होती. त्यामुळे रुढ अर्थाने जरी भाषांतरे मराठीत केली गेली नाहीत, तरी लोकांना समजेल अशा वृत्तीतून ग्रंथनिर्मिती केली गेल्याचीही अनेक उदाहरणं आपल्याकडे आहेत.

खिस्तपूर्व सहाव्या शतकात बुद्धाने आपली मते लोकांस समजावी म्हणून, त्यावेळच्या सामान्य लोकभाषेत लोकांस धर्मोपदेश केला हे प्रसिद्धच आहे.

आपली सर्व धर्मक्रिया श्रुतिस्मृति पुराणोक्त होत राहिली. यज्ञप्रसंगी वा उत्सवप्रसंगी पुराणांचे निवेदन प्रथम संस्कृतात व नंतर प्राकृतात होऊ लागले. भागवतादी पुराणांचा पारायणविधी तयार झाला. भगवतसप्ताहात सकाळी संस्कृत संहितेचे वाचन होऊन दुपारी त्या भागावर प्राकृतातून विवरण सुरू होई. परंतु ह्याला सर्व आधार संस्कृत भाषेचाच होता. पुराणाची पोथी घरात असली, तिचे पूजन केले की अक्षय फळ प्राप्त होते, या फलश्रुतीमुळे घरातून संस्कृत पोथी पुजेसाठी प्रचारात आली. पण त्यांच्या संस्कृत भाषेमुळे पुराणांचे आकर्षण मर्यादित राहिले. प्राकृत निरूपणामुळे जेवढे समजे त्यावरच संतुष्ट रहावे लागले. परंतु पुढे गद्याचा प्रभाव वाढला. प्राकृत जनांची अस्मिता वाढली. प्राकृत भाषेतून पुराण भाषांतरित करण्याची कल्पना रुढ झाली.

प्रारंभीची ग्रंथनिर्मिती संस्कृत भाषेतील ज्ञानभांडार लोकांना मराठीत उपलब्ध करून द्यावे ह्या प्रेरणेने झाली. अर्थात संस्कृतमधील सर्वच प्रकार मराठीत आणावेत हा हेतू नव्हता; तर त्या भाषेतील ब्रह्मविद्या किंवा अध्यात्मशास्त्र ह्यावर लक्ष होते. अध्यात्मविचारांनी संपन्न अशी संस्कृत भाषा सर्वसामान्य लोकांच्या वापरातून गेल्या प्रमाणेच होती. तिचे अस्तित्व केवळ चार पंडितांच्या पुरते उरले होते. साहजिकच अध्यात्मिक जीवनावर ज्यांची श्रद्धा होती असे ग्रंथकार संस्कृतकडून मराठीकडे वळले. कारण त्यांच्या मनातून ती श्रद्धा एकंदर समाजाच्याही मनात उतरावी असे होते व तसे व्हायचे तर त्या समाजाच्या भाषेत, म्हणजे मराठीतच बोलणे त्यांना भाग होते. ह्या दृष्टीने महानुभाव पंथाचे आद्य आचार्य नागदेव किंवा भटोबास ह्यांच्या दोन स्मृती उल्लेखनीय आहेत. केशिराज पंडितांनी चक्रधरांच्या लीळाचरित्राचा संस्कृत अनुवाद 'रत्नमालास्तोत्र' ह्या नावाने काव्य रचून केला होताच. पुढे त्यांच्या 'सूत्रपाठां' तील उद्धरण या प्रकरणालाही संस्कृत वेष द्यावा असे वाटून त्यांनी हा विचार नागदेवाचार्यांपाशी बोलून दाखविला. तेव्हा त्यांना त्यापासून परावृत्त करताना आचार्य म्हणाले, 'नको गा केशवदेया : येणे माझिया म्हातारीया नागवतील '' (स्मृतिस्थळ १५) म्हातारीया म्हणजे सामान्यजन. त्यांना स्वामींचे तत्वज्ञान संस्कृत भाषेत सांगून काय उपयोग ? दुसरी स्मृति अधिक उद्बोधक आहे. एकदा केशिराजांनी नागदेवाचार्यांना संस्कृत भाषेत काही प्रश्न केला. तेव्हा त्याचे उत्तर देण्याचे टाळून आचार्य त्यांना म्हणाले,

'' पंडिता: केशवदेया : तुमचा 'अस्मात-कस्मात' मी नेणे गा : मज श्री चक्रधरे निरुपिली मऱ्हाटी : तियांचि

पूसा : '' (स्मृति ६६)

सर्वात मुख्य म्हणजे महानुभाव पंथाचे आद्य प्रणेते जे चक्रधरस्वामी त्यांचेच धोरण मराठीला अनुकूल होते.

मुकुंदराजासारखा वैदिक परंपरेतील आद्य मराठी ग्रंथकारही ह्याच प्रेरणेने प्ररित झाला होता. 'विवेकसिंधू' च्या प्रारंभी ते असे म्हणतो,

''वेदशास्त्राचा मथितार्थु । मऱ्हाटिया जोडे फलितार्थु।
तरी चतुरी परमार्थु । का नेघावा ॥
धुळीआंतील रत्न । जरि भेटे न करितां प्रेत्न ।
तरी चतुरी येत्न । कां न करावा ॥
कल्पतरूचेनि पडिपाडे । जन्ही फळली घरिंची झाडे ।
तन्हि तिथे वाढयेचेनि कोडे । न लावावी कां ॥
भाषा हो कां मऱ्हाटी । परि उपनिषदांचीच राहाटी ।
तेथिंचा अर्थु जीवाचिये गांठी । कां न बांधावा ॥''

पुढे १०० वर्षांनंतर ज्ञानेश्वरी लिहितानाही ज्ञानेश्वरांनीही असा भाव प्रकट केला आहे.

''तीरि संस्कृताची गहने । तोडुनिया मऱ्हाटिया केली शब्दसोपाने ।
रचिली धर्मनिधाने । निवृतिदेवे ॥ (ज्ञा. ११)

आपण 'आबालसुबोध' ग्रंथ रचून सर्वांची सोय पाहात आहोत ही जाणीव ज्ञानेश्वरांच्या मनात सतत जागृत आहे.

शके १५०० च्या सुमरास 'बाळबोध' नावाचा ग्रंथ रचणाऱ्या त्र्यंबकरायात त्या दिसतात.

'वापीकूप देववाणी । मध्ये सखोल अर्थपाणी ।
ते सुदेशी सेंदणी भरुनी । आहाच कीजे ॥
धन्य धन्य हे मराठी । हे ब्रह्मविद्येची कसवटी ।
हा द्वारशिलेचे पोटी । परिसु जोडिला ॥ (१२-९४)''

एकनाथांनी तर पदोपदी मराठीचा महिमा गायला आहे.

''संस्कृत वाणी देवे केली ।
तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ॥''

भागवत, रामायणांसारखे संस्कृत ग्रंथ समाजाला मराठी भाषेत उपलब्ध करून देणे हे त्यांचे जीवितकार्यच दिसते. ही प्रेरणा त्यांच्या ठिकाणी किती उत्कट होती ह्याची साक्ष त्यांच्या एकादशस्कंधावरील टीकेच्या इतिहासात मिळते. ह्या ग्रंथाचे पहिले पाच अध्याय लिहून झाल्यावर नाथ काशीला गेले व तेथील संस्कृत पंडितांच्या विरोधाला तोंड देत त्यांनी हा ग्रंथ तेथेच पुरा केला; इतकेच नव्हे तर ज्यांनी विरोध केला होता त्यांनीच तो पूर्ण झाल्यावर पालखीत मिरवला.

या सर्व उदाहरणावरून असे दिसते की मराठीच्या प्रेमाखातर अनेक कवींनी संस्कृतला आव्हान दिले. हे आव्हान का दिले तर सामान्यजनांना संस्कृतमधील ज्ञान कळावे, त्यांनाही त्याचा आस्वाद घेता यावा. ते त्यापासून वंचित रहाता कामा नये. तसे पाहता या सर्व रचनेला अनुवादित वाङ्मय म्हणता येईल किंवा नाही या विषयी शंकाच आहे. परंतु भाषांतरामागील प्रेरणा आणि या वाङ्मयामागील प्रेरणा काही बाबतीत समान असल्याचे दिसून येते. भाषांतर करताना भाषांतर कर्त्याचा एक उद्देश असा असतो की अन्य भाषेतील ज्ञान आपल्या इतर बांधवांना करून द्यायचे आणि याच हेतुने प्रेरित झालेले ज्ञानेश्वर, एकनाथ, मुकुंदराज इत्यादी दिसतात. या अर्थाने हा प्रवास भाषांतरित प्रक्रियेशी समांतर जाताना दिसतो.

**प्रा. प्रदीप कर्णिक**
सोनल अपार्टमेंट, वंदना सोसायटी समोर, ठाणे.
दूरध्वनी : ५४० ४२०६

•••

---

असंतोष हे उत्कर्षाचे मूळ आहे.

# लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेला आदर्श सार्वजनिक गणेशोत्सव

श्री. राजेश प्रभाकर देवधर, श्री.मधुकर गजानन देवधर

*१ऑगस्ट ! लोकमान्य टिळक पुण्यतिथी. त्या निमित्ताने लोकामान्यांनी रूढ केलेला गणेशोत्सवा बद्दलचे काही विचार.- संपादक*

एका वेगळ्या उद्देशाने प्रेरित होऊन लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची जी प्रथा निर्माण केली त्याला आज आलेले बाजारु व सवंग रुप पाहून लोकमान्यांना अभिप्रेत असलेला सार्वजनिक गणेशोत्सव इतिहासजमा झाला याबद्दल आपल्या सगळ्यांची खात्री पटलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ देवआळी पेण येथील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ५०व्या म्हणजेच सुवर्णमहोत्सवी समारंभात दोन दिवस सहभागी होण्याचा योग आला आणि आश्चर्याचा व आनंदाचा सुखद धक्का बसला.

शिस्तबद्ध कार्यक्रम, प्रामाणिकपणे व मनापासून काम करणारे कार्यकर्ते आणि भारतीय संस्कृती जपणारे व दर्शविणारे कार्यक्रम ही या सार्वजनिक गणेशोत्सवाची त्रिसूत्री होती. ओंगळवाणा, सवंग, बाजारु अशा प्रकारच्या सर्व कृत्यांना वावींना या ठिकाणी थारा नव्हता.

सुवर्णमहोत्सवी वर्षासाठी कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत जागोजागी जाणवत होती. मग ती कार्यक्रमाच्या निवडी वा आखणीबाबत असो, श्री गणेशाच्या सजावटीबाबत असे किंवा अगदी विर्सजनाच्या मिरवणुकीच्या योजकतेबाबत असो.

देवआळी जणू काही खरोखरच स्वर्ग आळी झाली होती. सगळीकडे एक प्रसन्न, मंगलदायी, उत्साही आणि पवित्र वातावरण होते. ह्या वातावरणाशी एकरूप होऊन मी श्री गणेशाची मूर्ती जिथे होती तिथे पोहोचलो आणि अक्षरशः अवाक होऊन पहात राहिलो. पेशवेकालीन राजवाडा आत समग्र सुबक व देखणी अशी श्री. आनंद देवधर यांनी घडवलेली मूर्ती. झुंबर, सनई वादन शांत व मंगलमय वातावरण, गोपालकृष्ण हॉलच्या पायऱ्या चढत असताना समोरच असलेला व गुरुस्थानी असलेला भगवा ध्वज. तसेच संपूर्ण देवआळीला रोषणाई त्याचबरोबर नुकताच कारगिल येथील युद्धात अमर झालेल्या जवानांसाठी जय जवान स्मृतिस्तंभ.

सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्यामुळे श्रीची विसर्जन मिरवणूक अत्यंत थाटामाटात काढण्यात आली. चांदीच्या रथात विराजमान झालेली श्रीची मुर्ती अग्रस्थानी मागे श्री बालकृष्णाची फुलांनी सजविलेली पालखी त्यामागोमाग छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी व गणेशोत्सवाचे प्रेरणास्थान असलेले बाळ गंगाधर टिळक यांची पालखी. त्यामागे पुणे येथील 'स्वरुप वर्धिनी' यांचे ७० जणांचे व श्री. कवळेकर सर यांचे नेतृत्व असलेले लेझीम पथक, ढोल व ध्वज पथक, लहान मुलांनी केलेले शिस्तबद्ध अप्रतिम नृत्य. पारंपारीक पद्धतीने वेशभूषा केलेल्या देवआळीतील स्त्रिया व इतर रहिवाशी. मागे शिवसेनेचे नेते मा. अनंत तरे, सार्वजनिक गणेशोत्सवाचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ देव सुवर्णमहोत्सवी वर्षाचे अध्यक्ष श्री. अभय साठे, उपाध्यक्ष श्री. रिसबुड व इतर पदाधिकारी व असंख्य सभासद व पेणमधील रहिवासी मोठ्या संख्येने सामील झाले होते. नेहमीप्रमाणे गुलाल न उधळता फुलांच्या पाकळ्या श्री गणेशावर व भक्तगणांवर उधळीत मिरवणूक निघाली. मिरवणुकीत प्रत्येक विभागात असणाऱ्या नगरसेवकांनी केलेली पुष्पवृष्टी, भक्त गणांना दिलेले सरबत, पाणी व

पेढे त्यात नगराध्यक्ष श्री. अनंत नाईक व इतर नगरसेवक मिरवणुकीत सामील झाले. योगायोगाची गोष्ट म्हणजे श्री (अनंत) श्री. अनंत तेरे व नगराध्यक्ष श्री. अनंत नाईक या त्रयींचा संगम येथे झाला होता. पेण नगरपालिका हद्दीतील असणाऱ्या अरुंद गल्लीचा परिणाम एवढा सुंदर झाला की देवआळीतील एका गल्लीत एक हजार जणांचा जनसमुदायाने केलेल्या जयजयकाराने गर्जनेने तो जनसमुदाय दहा हजार जणांचा आहे असा भास झाला व आपण पावन खिंडीत आहोत असे वाटले कारण पावनखिंडीत शूरवीर सरदार बाजीप्रभु देशपांडे आपल्या निवडक मावळ्यांबरोबर शत्रूशी लढत असताना 'हरहर महादेव' चा घोष चालू होता. त्यामुळे शत्रुला पावनखिंडीत किती मावळे आहेत याचा अंदाज येईना, असो.

सतत सहा तास चाललेला हा विसर्जन सोहळा शेवटी नदीकाठावर आल्यावर सर्व गणेशभक्तांच्या उपस्थितीत श्री गणेशाला भावपूर्ण निरोप देण्यात आला व सर्वजण निघाले ते झालेल्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याच्या आठवणी घेऊनच व साठवूनच.

गोपालकृष्ण हॉलमध्ये अभिप्राय लिहिण्यासाठी नोंदवही होती परंतु थोडक्यात काय अभिप्राय लिहायचा ते शब्द सुचत नसल्यामुळे हे सर्व लिहायचा खटाटोप. पुण्याचे पहिले पाच मानाचे गणपती ऐकले होते. परंतु रायगड जिल्ह्यातील पहिल्या मानाचा गणपती म्हणून देवआळी पेण येथील गणपती असे गौरविले तरी अतिशयोक्ती होणार नाही.

सर्व पदाधिकाऱ्यांना, सभासदांना व देवआळीतील सर्व रहिवाशांना पेणच्या प्रत्येक गणेशोत्सवाच्या मनापासून शुभेच्छा व पेण येथील येणारा प्रत्येक गणेशोत्सव हा सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या गणेशोत्सवापेक्षा अधिक भव्य होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**श्री. राजेश प्रभाकर देवधर, श्री. मधुकर गजानन देवधर**

•••

*With Best Compliments from*

**EVEREST ARTS**

A/2, Shah& Nahar Industrial Estate,

S.J. Marg, Lower Parel,

Mumbai - 400 013

With Best Compliments from

# FASTO

## Engineering Pvt. Ltd.

***Mfgrs. :***

**Hydraulic Cylinders & Hose Assemblies**

**Office & Factory**

Plot No. 133-A, Raod No. 23,
Wagle Estate, Thane 400 604.
Phone : 582 16 73 / 582 511 7

Fax : 022-582 59 16
Email : fasto@bom3.vsnl.net.in

माणसाची सारासार बुद्धी काही प्रमाणात तरी आयुष्यभर बालबुद्धीच असते.

# 'ओशो' आणि प्रेम

श्री. अरविंद दोडे

*अध्यात्मात विशेष रस असणारे श्री. अरविंद दोडे यांनी आचार्य रजनीकांत तत्त्वज्ञानाचा आधार या लेखात घेतला आहे. - संपादक*

शब्दांना जे सांगता येत नाही, अश्रू ते सांगून टाकतात! शब्द फार दुर्बल ठरतात, अश्रूंपुढे..... शब्द मर्यादित असतात. अश्रूंना कसली मर्यादा ? बोलूनही बोलायचं खूप काही राहून जात. अश्रू न बोलता सारं काही सांगून टाकतात.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या आयुष्यातला एक प्रसंग आहे.... ते मृत्युशय्येवर पडले होते. त्यांनी जवळ जवळ सहा हजार कविता लिहिल्या होत्या. त्यांचा मित्र त्यांना म्हणाला, 'तुम्ही भाग्यवान आहात. परमेश्वराचे आभार माना. सहा हजार कविता त्याने तुमच्याकडून लिहून घेतल्या आहेत. तुम्ही, महाकवी आहात. इंग्रजीत कवी 'शेली' नं. दोन हजार कविता केल्या आहेत. त्याला ही महाकवी म्हणतात.'

गुरुदेव खिन्नपणे हसून उत्तरले, 'मित्रा, परमेश्वराला मी विचारतोय, इतकी घाई कसली ? मला जे सांगायचंय, ते सांगायचं राहिलयं देवा अजून. ह्या सहा हजार कविता म्हणजे माझ्या अपयशांचा पुरावा आहे ! सहा हजार वेळा मनातलं शब्दांत सांगण्याचा प्रयत्न केला पण सहा हजार वेळा मला पराभवच पत्करावा लागला. सत्य मागेच राहून गेलंय.'

गुरुदेवांनी पुढे सांगितलं, ' आताच कुठं लिहिता येऊ लागलं होत. कुशलता लाभली होती. छिन्नी चालवण्याचं कसब आलं होत. म्हटलं, एक सुंदर मूर्ती करूया. काही लेखणीच्या फटकाऱ्यांनी शब्दात बांधूया. नुकताच माझा तबला, वीणेच्या सुरांसोबत ताल धरु लागला होता. अजून मनासारखी कविता झाली नाही अन् जाण्याची वेळ येऊन ठेपलीय...'

गुरुदेव हजार वर्षं जगले असते तर ? जमली असती त्यांना मनासारखी कविता ? नंतरही ते हेच म्हणाले असते ना? तुम्ही म्हणता, 'मला काही सांगायचं, पण जमत नाही.'

तुमचं म्हणणं असं आहे की, न बोलताच खूप काही सांगता येईल. शब्दांचं ओझं बाजूला ठेवा. मौनाचा आधार घ्या. मौन फार बोलकं असतं. गाढ असतं. प्रगाढतेनं बोलतं.

मौनाचं महात्म्य काय सांगावं? मौन बोलतं. त्याच्या बोलण्याला सीमा नसते. मौन आकाशाप्रमाणे असतं- असीम. शब्द म्हणजे छोटं छोटं अंगण. अंगणाचा अट्टहास सोडा, आकाशाचा ध्यास घ्या. त्याचा हव्यास धरा.

'बहुत ही डरते डरते
आज यह इज़हार करता हूँ ।
मैं तुम को चाहता हूँ,
पूजता हूँ, प्यार करता हूँ ॥'

सारं काही सांगता येऊ शकतं, प्रेम नाही सांगता येत. आतून उठणारं अपूर्व प्रेम... ते जन्मत:च बुद्धी अवाक् होते. कारण प्रेम बुद्धीचं अंग नसून हृदयाचं असतं. आणि आपले ही अश्रू येतात हृदयाकडून.

बुद्धीमुळे आसवांना प्रेरणा मिळत नाही. बुद्धीमुळे डोळ्यात वाळवंट तयार होतं. सर्वत्र दुष्काळ पडतो आसवांचा. मग हिरवाई कुठची ! अन् झरे कसले? फुलं फुलत नाहीत. पाखरं गात नाहीत.

माणूस अत्यंत वाईट पद्धतीनं असा कोरडा पडलाय!

---

सुहास्य असा अलंकार आहे की तो कोणत्याही कमळावर शोभूनच दिसतो.

पुरुष तर फारच वाईट रितीनं सुकून गेलेत. कारण काय ? तर आपण पुरुषांना सतत शिकवण दिलीय 'रडू नका' देवानं कुठं भेद मानलाय ? जितकी स्त्री रडू शकते, तितकचं पुरुषही. ह्याचे दुष्परिणाम सर्वत्र दिसताहेत.

सर्वांत मोठा तोटा हा झालाय की, पुरुष अधिक प्रमाणात वेडे झालेले दिसतात. दुप्पटीनं म्हटलं तरी चालेल. पुरुषांच आत्महत्येचं प्रमाणही अधिक आहे. पुरुषांनी केलेल्या युद्धांचं प्रमाण पाहिलं तरी पुरेसं आहे. दर दहा वर्षांनी युद्ध होतात कुठं ना कुठंतरी. दुःख, उदासीनता, क्रोध या साऱ्यांचा विस्फोट होतो.

युद्धाचं वेड म्हणजे विकृती. वेडेपण
अश्रू येतात.. हृदयातून
आणि आपल्याला 'ध्यान' करायचंय
ही ध्यानयात्रा म्हणजे अंतर्यात्रा आहे.

तुमची उर्जा बुद्धीच्या नादी न लागता हृदयाच्या नादी लागावी. उत्तम आहे, तुम्हाला सांगता येत नाही ते. सांगण्यासारखं आहेच काय?

असलंच तर केवळ प्रेम आहे !
न सांगण्याच्या मार्गावर तुम्ही आलाच नाहीत कधी.

'गीत प्राणों में जगे,
पर भावना में बह गए
एक थी मन की कसक
जो साधनाओं में ढली,
कल्पनाओं में पली .
पंथ था मुझ को अपरिचित,
मैं नहीं अब तक चली,
प्रेम की संकरी गली....'

असं एका कवयित्रीनं म्हटलयं. प्रीतीची वाट अरुंद असते. आसवांचंही तसंच असतं. काही थेंब असतात फक्त पण ते शुभ असतात. सत्य असतात. सुंदर असतात. प्रेमाच विश्व तुम्हाला अनोळखी आहे. म्हणून अस्वस्थता वाटत असेल. म्हणून काही बोलावसं वाटतयं.

'प्रेम की संकरी गली....'

घाबरू नका. बेचैन होऊ नका. चिंता करू नका. प्रेमाची वाट अरुंद खरी... तिथं 'दोन' असणं अशक्य. इतकी अरुंद की, शब्दांनाही जागा नसते. मौनालाच फक्त प्रवेश.

पडू देत पाऊल. येऊ देत हृदयाकडे
विचार, शब्द, भाषा, बोली हे सगळं मानवनिर्मित.
निर्विचार, मौन ही ईश्वरदत्त असतात.
'कह नहीं सकती,
हृदय की जीत थी, या हार थी ।
वेदना सुकुमार थी ...?

वेदना! अवीट शब्दांमधील एक शब्द ! वेदनेचे अर्थ दोन : दुःख आणि बोध... दुःख आणि ज्ञान. वेदना शब्द आला कसा ? ज्यापासून तयार झाला - वेद ! वित् धातूपासून तयार झालेला. वेदाचा अर्थ होतो-ज्ञान, बोध. काय गंमत आहे बघा, दोन विपरित अर्थ-एकाच शब्दाचे.

बोध होतो तो दुःखाचाच

पायात काटा बोचता तर पायाचा बोध होतो. डोकं दुःखतं तर दुःखापेक्षा डोक्याचाच बोध आधी होतो. जिथं वेदना होते, त्याचाच बोध होतो. परमेश्वराचा बोध केव्हा होतो? जेव्हा वेदना होते. आत जळतं, खटकतं तेव्हा. काही एकाकीपणा काही कमतरता, काही चुकल्यासारखं, अर्थहीन आयुष्य वाटू लागतं तेव्हा. करतात सगळे, पण होत काहीच नाही. कारण करतात ते सगळं बुद्धीन, हृदयान नाही... आणि बुद्धीनं ईश्वराशी नातं जोडताच येत नाही !

ईश्वराशी संबंध जोडायचा असेल तर भावनेत धुंदी हवी. भक्तीत नशा हवी. प्रार्थनात कैफ हवा.

---

प्रेम ही अनुभवाची भाषा आहे.

आणि दुःख असतं दोन प्रकारचं:
एक विरहाचं, दुसर मीलनाचं,

मीलनाची पीडा मोठी गोड असते. मधुर असते. विरहाचीही अशीच असते. सुंदर, हवीहवीशी. भक्ताला दोन्ही भोगावं लागत. वियोगपीडा आवडते कारण, ईश्वर अजून भेटला नाहीए. वाट पहायला हवीय. प्रतिक्षा.... सतत जागं राहायला हवयं. हेही सुखद असतं. अश्रू वहात असतात.... मग 'तो' भेटतो. तेव्हाही अश्रू वाहतात.... आनंदान. म्हणून बोलता येत नाही. महत्त्वाचं बोलताना नेहमीच संकोच वाटतो. लाज वाटते.

'माझं तुझ्यावर प्रेम आहे.' हे म्हणायला किती कठीण जातं, ते प्रेमिकानाच विचारा.

'प्रेम' हा शब्द इतका छोटा आहे की, त्याचा अर्थ व्यक्त करू शकत नाही. मौनातच ते व्यक्त करावं.

मैं स्वयं में खो गई,
और अब तो प्राण मेरे
कुछ उगे-से रह गए...
गीत प्राणों में जगे पर
भावना में बह गए....'

असं जन्मावं प्रेम. नाही पाझर फुटला प्रेमाचा तर तुम्ही दुर्दैवी आहात, असंच म्हणायला हवं. काही बोलायचं, पण जमत नाहीए-हेच खरं भाग्याचं आहे! जे लाभतं आतल्या आत, ते परत कसं द्यायचं ? परतफेड करण्याचा एकच मार्ग: इतरांवर भरभरून प्रेम करणं. हात कृपणता कशाला?

येशू ख्रिस्तानं आपल्या शिष्यांना म्हटलयं, 'जा, घराच्या छतावर उभे रहा. ओरडून सांगा. जे बहिरे आहेत, त्यांना कळू द्या'. तेच मी तुम्हाला सांगतोय.

तुम्ही म्हटलयं, 'तुमचे आभार कसे मानावेत?'
नका मानू. तुमच्या डोळ्यांनी मला सांगितलयं सगळं.

आणखी एक प्रेमाची, प्रामाणिकपणाची खूण सांगतो :

बेइमान व्यक्ती जेव्हा तुमच्या जवळ असते किंवा काही धोका देणार असते- जर तुम्ही सरळ मनाचे असला तर तुमच्या पटकन लक्षात येईल. परंतु, तुम्ही बेइमान वृत्तीने वागणार असाल तर कठीणच आहे!

तुमच्या अंतरात खरंखुरं, निरपेक्ष प्रेम उदय पावलं असेल तर तुम्हाला दुसऱ्यांच अंतरंग कळेल-ज्याला तुमच्याबद्दल प्रेम आहे. तो बोलो न बोलो. तुमच्या जगण्यात प्रेम नसेल तर प्रेमळांच प्रेम तुम्हाला कधीच कळणार नाही.

दुसरी प्रेमाची गोष्ट म्हणजे गुरुशी नात जोडणं.

गुरुशी संबंध जोडणं म्हणजे परमात्म्याकडे टाकलेलं पहिलं पाऊल ! गुरुशी प्रेमाचं नातं म्हणजे देवाशी तादात्म्य. गुरु भेटला की देवाशी एकरूप होण्यात कसली अडचण ?

गुरु म्हणजे एक धडा. एक स्तोत्र.

ईश्वरास सर्वस्व अर्पण करण्याचा. त्याच्यापर्यंत पोहचण्यासाठी गुरु म्हणजे महाद्वार. शिखांचा शब्द 'गुरुद्वार' फार सुंदर आहे. मंदिराचं नाव हेच असावं. अगदी योग्य आहे.

'गुरु' नामक दारीच थांबायचं नाही. दार ओलांडून जा त्याच्यापर्यंत जा. माझे कसले आभार मानता? जे काय बोलायचं. असेल ते त्याच्याशी बोला. माझ्या पैलतीरी जा.

तिथंही तुम्हाला काही बोलता नाही येणार. आहेच काय बोलण्यासारखं? बोलायचं काय ? ते क्षुद्र आहे. न बोलण्यासारखं विशाल आहे. विराट आहे. 'लाओत्से' न म्हटलयं, जे सांगता येतं ते असत्य, जे येत नाही ते शाश्वत सत्य!

**श्री. अरविंद दोडे**
शालन भोईर वाडी, खोपट, ठाणे (प.) ४०० ६०२.

• • •

मोहाचा पहिला क्षण ही पापाची पहिली पायरी असते.

# ग्रंथांची उपेक्षा

**श्री. मोहन पाठक**

*ग्रंथांची उपेक्षा संपावी या दृष्टीने ग्रंथालयातील सेवकांनी कार्यरत झाले पाहिजे. वाचक व ग्रंथ यांची भेट घडवून आणली पाहिजे. या दृष्टीने काही विचार- संपादक*

काही पुस्तकं उपेक्षेचा शाप घेऊनच जन्म घेतात. पुस्तकाचा जन्म ही खरे तर प्रदीर्घ प्रक्रिया. पण या प्रक्रियेतून जन्म घेणारी काही पुस्तकं जन्म सार्थकी न लागल्याने वाचकाची वाट पहात आपलं अस्तित्व जपून असतात. अगदी धुळीच्या स्वाधीन करून स्वत:तले स्वत्व जपत असतात.

अशी पुस्तकं चांगली नसतात का?. ज्या अर्थी वाचकांची त्यांना मागणी नसते त्या अर्थी ती पुस्तकं कालबाह्य ठरलेली, निरुपयोगी असतात. म्हणून त्यांच्या उपेक्षेचे काही वाटू नये इतकी आपली वृत्ती थंड करून भागणार आहे का? अर्थ शास्त्रातील मागणी तसा पुरवठा या सिद्धांतातील तथ्यांश मान्य करूनही या पुस्तकांच्या अपेक्षेचे कारण शोधणे महत्त्वाचे आहे. वाचकाला त्याला हवा असणारा ग्रंथ व ग्रंथाला त्याला शोधणारा वाचक या गृहीत गोष्टींवर समग्र ग्रंथालय व्यवहार आधारला आहे. प्रकाशन व्यवसाय आधारला आहे असे असताना समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची खूण मानली जाणारी ग्रंथालये ही केवळ धुळागरे बनतात, असे अनेकानेक वाचनीय ग्रंथ त्या धुळीच्या स्वाधीन होतात ही कोणती प्रगती आहे?

ग्रंथालय म्हणजे चार कपाटं, त्यात भरलेली आणि कुलुपात अडकलेली पुस्तके हा जुनाट विचार आमच्या हाडीमाशी खिळला आहे. ग्रंथ हे उपयोगासाठी असतात हे आम्ही सोयीस्करित्या विसरलो आहोत आणि 'हरवला तर...?' 'फाटला तर.....?'' या चिंतानी कपाटाला कुलुपे लावून बसलो आहोत. ग्रंथालयासारख्या पवित्र वास्तूत जोवर ग्रंथांची ही अवस्था आहे तोवर प्रगती तर सोडाच गती (आणि मती ही) कुंठित झाल्याशिवाय रहाणार नाही.

सार्वजनिक, शैक्षणिक अशा कित्येक ग्रंथालयात ग्रंथालय कर्मचाऱ्यांशी बोलताना ग्रंथालयात काम करताना मागणी असणारी पुस्तके नेहमी प्रामुख्याने जाणवतात. ग्रंथालय जिवंत असेल, ग्रंथालयातील सेवकांना ग्रंथ वाचले जावेत असे मनापासून वाटत असेल आणि मुख्य म्हणजे अनुदान पद्धतीतून आलेल्या 'हरवला तर भरून कोणी द्यायचा' हा प्रश्न उरणार नसेल तर अनेक मागणी नसलेली पुस्तके वाचली जातील हे अनुभवातून मला जाणवते. मुळात ग्रंथ ही वस्तू नाही सर्वसामान्य भोग्य वस्तू पेक्षा ग्रंथाचे महत्त्व वेगळे आहे आणि समोर ग्रंथांची अपेक्षा ठेवून येणारा वाचक आहे चोर नाही याची जाणीव आमच्यात नाही. याला काही वाचक जबाबदार आहेत ही दूसरी बाजू. कटु वस्तुस्थिती मान्य करूनही प्रत्येक वाचक पुस्तक फाडायला किंवा चोरयला नेतो हे म्हणणे संयुक्तिक होणारे नाही.

ग्रंथ अधिकाधिक वाचकापर्यंत गेला पाहिजे. रामदासांच्या एका ओवीत म्हटल्यानुसार वाचून वाचून शिथिल झालेला ग्रंथ हा उत्तम ग्रंथ मानावा. या सदरात आज अनेक ग्रंथ मोडू शकतात, पण एकूणच सामाजिक जीवनातील नैराश्य, काम टाळण्याची, सुखासिनतेकडे झुकणारी वृत्ती यामुळे ग्रंथ वाचायला देण्यास आम्ही फारसे राजी नसतो.

आपल्याकडे येणारा वाचक व आपण ग्रंथालय सेवक यांच्यात ऋणानुबंध निर्माण होऊन त्या वाचकाच्या

आवडी निवडींचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे. अपेक्षित ग्रंथांपैकी अनेक ग्रंथ त्या वाचकाच्या नजरेस आणून देणे हे आपले अंगीकृत कर्तव्य आहे. एका ग्रंथालयाच्या प्रदर्शनात एका वाचकाने लिहिलेल्या अभिप्राय फार सूचक आणि अंतर्मुख करायला लावेल असा होता. '' आज कोणाचे भाग्य उदयाला आले तेच कळत नाही, वाचकांचे की ग्रंथांचे?'' वाचकाला ग्रंथ दिसलेच नाहीत, (केवळ मालिकेच्या आधारानेच ग्रंथ कळतो हे पूर्ण सत्य नाही) किंबहुना सेवकाने त्याच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिले नाही तर तो वाचक ग्रंथाची मागणी करेल हे संभवते काय? यासाठी थोडी इच्छा ठेवून, कष्ट घेऊन वाचनाची खरी गोडी असणारे वाचक शोधणे, त्यांना ग्रंथालयात यावेसे वाटेल असे वातावरण ठेवणे आणि त्याला आपणाहून ग्रंथ दाखविणे. त्या ग्रंथाचे महत्त्व सांगणे ही खरे तर आवश्यक बाब आहे.

माझ्या ग्रंथालयातील एका प्राध्यापकांना मी सकलसंत गाथा या मालिकेतील पहिला खंड दाखवला व आपल्या वडिलांच्या चातुर्मासात वाचण्याच्या दृष्टीने हे पुस्तक कसे उपयुक्त आहे ते सांगितले. प्राध्यापक विज्ञान शाखेचे त्यामुळे त्यांना तपशिलाने सांगून, शिवाय यातील अभंग मोठ्या टाईपात असल्याने आपल्या वडीलांना वाचतांना त्रास होणार नाही हे पटवून सांगितले. त्यांनी माझ्या सुचविण्यावरून ग्रंथ नेला व त्यांच्या वडिलांनी आजूबाजूच्या वृद्ध मित्रांनाही हा ग्रंथ दाखविला. सामुदायिक पठन झाले. वास्तविक नियमच पाळायचे तर प्राध्यापकाचे वडील हे काही आमचे वाचक होऊ शकत नाहीत कारण ते आमच्या संस्थेच्या नोकरीत नाहीत. शिवाय आपल्या वाचकाच्या घरी कोण आहे याचा तपशील वाचकाचा परिचय करून घेतल्या शिवाय होणार नाही. पण हे करण्याची तयारी ठेवूनच ग्रंथालय सेवा द्यावी. यामुळे ग्रंथाचे भाग्य उजळेल, त्यांना वाचक भेटतील.

एका माजी विद्यार्थ्याने तर दर महा माझ्याकडे येण्याचा परिपाठ ठेवला आहे. प्रत्यक्ष भेटीत नवीन काय (कोणते पुस्तक) विकत घेऊ ते रेकमेंड करा ही त्याची विनंती असते. असे वाचक भेटले की बरे वाटते. लग्नमुंजीतही आवर्जून पुस्तकच भेट देणारे ग्रंथप्रेमीही एक दिलासा असतात.

ग्रंथ चांगला की वाईट याचा निकष व्यक्ती सापेक्ष असतो. मुळात त्या व्यक्तीपर्यंत ग्रंथ पोहोचणे महत्त्वाचे असते. एका सार्वजनिक ग्रंथालयात देवघेव विभागात फक्त कादंबऱ्या होत्या. तेथील संबंधीत सेवकास मी विचारले, ' बाकीची पुस्तके नाहीत का ? ' त्यावर त्याने खूप आहेत पण ती आतल्या भागातील कपाटात आहेत आणि ती कपाट कधी उघडावी लागत नाहीत कारण की पुस्तक कोणी मागतच नाही. हे उत्तर दिले. मी मुद्दाम आतल्या कपाटाकडे गेलो. अनेक उत्तमोत्तम नाटके, काव्यसंग्रह, इतिहास, विज्ञान, चरित्रे अशी पुस्तके होती. त्याच ग्रंथालयाच्या एका वाचकाला विचारले असता तो म्हणाला,' आम्हाला ही पुस्तके येथे आहेत हेच ठाऊक नाही कारण देवघेवीच्या विभागात तर फक्त कथा-कादंबऱ्या आहेत.''

सुशिक्षितांना वाचनाभिमुख करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात समृद्धता आणणे हे ग्रंथालय सेवकाकडून अपेक्षित आहे किंबहुना वाचकाची अभिरुची ग्रंथालय सेवक अप्रत्यक्षरित्या घडवीत असतो. केवळ 'आजकाल लोक वाचतच नाहीत' असे कोरडे अभिप्राय देण्यापेक्षा पुस्तके वाचली कशी जातील याचा प्रयत्न ज्या दिवशी प्रामाणिक पणे होईल त्या दिवशी धूळ झटकण्याचे वेगळे काम करावे लागणार नाही. कारण धुळीत हरवलेल्या पुस्तकांची उपेक्षा त्या दिवशी संपायला सुरुवात झालेली असेल.

**प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.
दूरध्वनी : ५३३ ७६ ७२

•••

# स्त्री

सौ. वंदना प्रसादे

*स्त्री ! अनादी कालापासून चिंतनाला आव्हान देणारा सनातन विषय. आजच्या पुढारलेल्या जगात; सुशिक्षित म्हणवल्या जाणाऱ्या जगात स्त्री ला कसे वागवले जावे ! देवी समान असणाऱ्या स्त्रीला कोणती वागणूक दिली जाते !.... लेखिका सौ. वंदना प्रसादे यांना जाणवलेल्या काही गोष्टी. - संपादक*

अजूनही एक विचार आपल्याला संभ्रमात टाकतो की या पृथ्वीतलावर जेव्हा आदम-ईव्ह हेच दोन मानव होते, त्यापासून पुढे त्यातील समानता स्त्री-पुरुष या भेदात लोप पावली आणि स्त्रीला 'अबला' या शिक्याने जरुरीपेक्षा जास्तच मागे लोटले गेले.

आजचा समाज म्हणजे तरी काय, तुम्ही-आम्हीच! या पृथ्वीवर जन्माला येणारा प्रत्येकजण ज्या मातेच्या उदरात वाढतो, त्याच स्त्रीला कमी दर्जा देणारे पुरुष आजही आहेतच.

आजही असे दिसून येते मुलगी झाली म्हणजे काहीतरी भयंकर अपमानास्पद घडलंय. त्यासाठी एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचे स्वागत न करता अश्रू ढाळताना दिसते. तसे का तर तिला तो अपमान वाटतो. वास्तविक स्त्रीला आपली लेक, तिची माया ही हवीशी वाटणारी गोष्ट असते.

अरुणा ढेरे यांच्या लेखात वाचलेल्या ओळी आठवतात.

''जन्मा आली लेक, बाप म्हणतो कचरा,

माय म्हणते न्हाई घा, माझ्या जीवाला आसरा''

काळ कितीही बदलला तरी सर्व अधिकार स्त्रीला मिळालेला नाही. या बाबत अगदी मोजक्याच स्त्रिया प्रगती करू शकल्या. जी स्त्री हट्टाने आपले अधिकार आपल्या ईर्षेने मिळवायचा प्रयत्न करते त्यासाठी तिला बरीच मोठी किंमत मोजावी लागते.

मुलीने लहानपणापासूनच 'वळण' या नावाखाली बऱ्याच गोष्टी स्वतःत सांभाळून ठेवायच्या. कारण तिला लग्न दुसऱ्याच्या घरी जायचे असते. लग्नानंतर मुलांवर संस्कार करून तिला घडवायचे असतात. असा आपला समाज की मूल कुठे चुकले तर आईकडे बोट दाखवणारा.

या समाजाला गरज आहे खंबीर व्यक्तिमत्वाच्या स्त्रीची. पण घराबाहेर जाताना, येताना प्रत्येक क्षणाची परवानगी तिला बंधनकारक असते. तसेच घरातला कोणताही निर्णय तिला एकतर्फी घेण्याची परवानगी नसते.

आज नोकरी करणाऱ्या स्त्रीला स्वतंत्र समजले जाते. पण त्यातील प्रत्येक स्त्रीला जर विश्वासात घेऊन विचारले तर त्यातील एकतरी वेदना उफाळून येईल. स्त्री फक्त मिळवती आहे पण बहुतांशी त्या मिळवतीचा धनी दुसराच असतो.

मुलांना मार्कस् कमी मिळाले तरी आईलाच जाब विचारला जातो. घराबाहेर राहणाऱ्या स्त्रीला पण घरी वेळेवर पोहोचणे तिला बंधनकारक असते. तिचा पैसा, काम, नोकरी सर्व गोष्टी मान्य असतात पण तिचे स्वातंत्र्य नाही. परंतु स्त्रीने स्वतःला माजघरात कोंडून घेणे परवडणारे नाही.

आजच्या स्पर्धेच्या युगात आपली मुले त्यात टिकून रहावी म्हणून घरातील स्त्रीने सुशिक्षित असणे आवश्यक असते. पण नुसते सुशिक्षित असून चालत नाही तर तिने आपली मुले सुसंस्कारित करण्यासाठी झटले पाहिजे.

---

कविता हे सर्व ज्ञानपुष्पाचे अत्तर आहे.

स्त्रीमध्ये कलागुण असतील तर ते दडपून न टाकता त्यांना पुढे आणण्यासाठी पाठिंबा देणे ही कुटुंबाची जबाबदारी असते, पण असे पुरुष फार कमी आढळून येतील की ते स्त्रीला पुढे आणण्यासाठी धडपडत आहेत. पण त्यासाठी तेवढी वैचारिक पातळी असणे आवश्यक असते.

सर्वात मोठा संसाराचा आधारस्तंभ असतो तो म्हणजे 'विश्वास'. पुरुष कितीही वेळ बाहेर राहिला तरी ते 'कामानिमित्त बाहेर गेलेत' असा समज घरातील स्त्री करून घेते, पण असा विश्वास घरातील स्त्रीबाबत दाखवला जात नाही. 'आम्ही तिला जपतो' अथवा 'काळजी वाटते' या नावाखाली स्वातंत्र्य दिले जात नाही.

एखादी व्यभिचाराची घटना जेंव्हा आपण बघतो तेंव्हा ती कुठेतरी दडपलेल्या व्यक्तिमत्त्वाचे उदाहरण असते. त्यातूनच फसगत होत जाते. काही स्त्रिया आपला त्रास तोंड दाबून सहन करतात, तर कोणाबातरी पाय घसरतो.

यासाठी मानसिक संतुलनाची फार गरज असते.

'घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती,

तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती'

हे फक्त भिंतीवरच टांगलेले दिसते.

माजघरातील स्त्री उंबरठ्याबाहेर आली, तिची प्रगती झाली, शिक्षण मिळाले पण इतके की आज स्त्रियांचे शोषण ही भिन्न बाजू तर जाहिरातीत करमणुकीसाठी स्त्रियांचा वापर ही एक भिन्न बाजू.

विवाह बंधन ही पवित्र गोष्ट आहे. सप्तपदीमध्ये स्त्रीला प्रत्येक पावलास घेतलेल्या शपथेला त्या पतीसाठी - घरासाठी सर्वार्थाने झोकून देण्याच्या 'अटी' आहेत पण त्या तिने पूर्ण कराव्यात अशी अपेक्षा असते. पण पुरुषाने घेतलेल्या शपथा-वचने तो सहज तोडू शकतो.

आई-वडील होणे सोपे असते पण पालक होणे अवघड असते. मग यात संस्कारात स्त्री इतकाच पुरुषही कारणीभूत नाही का? प्रत्येकाने स्वतःच काही बंधने घालून घेतली पाहिजेत कारण घरही संस्था त्याशिवाय चालणार नाही. घर म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा यांची पूर्तता नव्हे.

एखाद्या स्त्रीने घटस्फोट मागितला तर तिला अविचारी अथवा मूर्ख समजले जाते. पण पुरुष असे निर्णय सहज घेऊ शकतात.

स्त्रीला अर्धांगिनी समजले जाते. याच पुरुषाचे अर्धे अधिकार, मान, स्वातंत्र्य तिला मिळतात का? बायको नसेल तर पुरुषाला कमरेला सुपारी बांधून कार्य करायचा अधिकार असतो. पण एखादी स्त्री विधवा झाली तर ती प्रत्येक ठिकाणी वर्ज्य असते.

समाजाचा सुधारितपणा विचारात पाडणारा असतो. माहेरची माणसे चुकली तर तो एक अक्षम्य गुन्हा असतो. पण सासरच्यांचा त्रास कर्तव्याच्या नावाखाली दाबला जातो.

माणसाला जगण्यासाठी आर्थिक हातभाराची गरज असते. तो कसा मिळवायचा आणि कुठे समाधान मानायचे हे ज्याच्या त्याच्या वृत्तीवर अवलंबून असते. लाचारी हा एक महाभयंकर प्रकार आहे त्यात आजचा माणूस जखडत चाललाय. तसेच मरणाला कवटाळणे तितके सोपे नाही. या जगात उघड्या डोळ्यांनी पहायला शिकले तर कितीतरी भयानक, विदारक सत्ये आपल्या समोर येतील.

आजच्या समाजाला स्त्री जाणून घ्यायची असेल. त्याने 'वॉटर' सारख्या चित्रपटांवर बंदी का घालावी? पण आज स्त्रीच्या अधिकारांची जाणीव कुठेतरी होत आहे. म्हणून 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती' शनिशिंगणापूरच्या वादात उतरली आहे.

एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला दलदलीतून वाचवायचा प्रयत्न नक्कीच करायला हवा तर कदाचित समाजातील गुन्ह्यांना आवर बसेल.

---

वेळ आणि लाट कधी कुणासाठी थांबत नाही.

कॉलेजमध्ये एका प्राध्यापकाला एक मुलगी बेंचच्या बाकावर झोपलेली दिसायची. त्या प्राध्यापकास संताप यायचा. आपल्या कळकळीने शिकवण्याचा आणि त्या मुलांच्या झोपण्याचा त्याला उलगडा होईना. कॉलेज सुटल्यावर सरांनी तिला भेटायला बोलावले. तिने घाबरत, खाली मान घालून जे सत्य सांगितले ते ऐकून त्या प्राध्यापकाचे पाणी पाणी झाले. एका वेश्येची ती मुलगी होती व ती वेश्या आजारी असल्याने ती मुलीला यात ओढू पहात होती. पोटासाठी. पण त्या प्राध्यापकाने तिला त्यातून बाहेर पडण्यास मदत केली. तिच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली व एका मुलीला बाहेरचे जग दाखवले.

या सत्याची भयाण तीव्रता स्त्री जाणू शकते. पण आजचा समाज जो बीभत्सतेकडे झुकलाय त्याला थांबवले पाहिजे. एकतर्फी प्रेम, त्यातून खून हे प्रकार आपल्याला काय सांगत आहेत. यासाठी स्त्रीने खंबीर पाऊल उचलले पाहिजे. आपली संस्कृती काय आहे हे आपण आपल्या मुलांना समजावले पाहिजे.

स्त्री जेव्हा स्वत: दुसऱ्या स्त्रीचा आदर करायला शिकेल, तिला मदतीचा हात पुढे करेल तेव्हाच समाज बदलेल.

बहिणाबाईंना जेव्हा विचारले, तुमच्या कवितांत माहेरचे कौतुक, प्रेम, ओढ ओतप्रत भरलेली आहे तर तुम्ही सासरी आलातच कशाला? तेव्हा त्या सांगतात,

'लेकीच्या माहेरासाठी, माय सासरी नांदते'

अशी त्यागमूर्ती स्त्री. तिने आपले स्थान ओळखायला हवे, समजायला हवे आणि टिकवायला हवे.

अशा अनेक आदर्श स्त्रियांचा इतिहास आपल्या पाठीशी आहे. स्त्रीने लग्न झाल्यावर पतीचे घर हेच आपले सर्वस्व मानून रहायला हवे पण अन्याय झाल्यास त्याचा प्रतिकारही करायला हवा?

पार्वतीच्या वडीलांनी दंभाने यज्ञ आयोजित करून स्वत:चा उन्मत पणा वाढवला पण शंकरांनी तिला आमंत्रणा शिवाय माहेरी जाऊ नको सांगितले. आपल्या पतीला आमंत्रण नाही हा संताप पण पित्याच्या घरी मुलीला आमंत्रण कशाला हवे ? अशा द्विधामन:स्थितीत पार्वती सापडते. अखेर ती माहेरी जाते. तिची माता धावत येऊन तिला आलिंगन देते. पिता विचारतो तू आमंत्रणाशिवाय का आलीस? दूध फळे घे आणि तुझ्या घरी जा. तिला अपमान सहन होत नाही आणि मानाने पतीच्या घरी जाऊ शकत नाही. तीव्रतेने शंकराचे मनन करून अग्निकुंडात उडी मारते. तेव्हा शंकर तिथे प्रगट होतात. अर्धे जळालेले तिचे शरीर खांद्यावर घेतात व उरलेल्या शरीराचे विष्णु तुकडे करून टाकतात. त्या ठिकाणी देवीची शक्तीपिठं आहेत.

ही कथा आपल्याला काय सांगते जेव्हा स्त्रीया समाजात मानाने जगू शकेल तो खरा सुधारित समाज म्हणता येईल.

सौ. वंदना प्रसादे

• • •

जॉर्ज मार्कोस लंडनच्या एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गेला. दुकानदाराने अदबीने विचारले

''काय सेवा करु आपली सौ?''

''मला टाय हवाय''

''हे घ्या, यातला हवा तो निवडून घ्या''

''काय किंमत आहे याची?''

'दोनशे रुपये''

''बापरे! दोनशे रुपयात फक्त एक टाय?

पलीकडच्या दुकानात तर दोनशे रुपयात दोन चपलांचे जोड मिळतात.''

दुकानदार म्हणाला ' पण साहेब आपण गळ्यात टाय ऐवजी चपला बांधल्या, तर कसे दिसेल?

# गिर्यारोहण

कु. संध्या राव

*महाविद्यालयातील एन्.सी.सी. च्या कॅडेट विद्यार्थिनींचा गिर्यारोहणाचा अनुभव या लेखात शब्दांकित झाला आहे. - संपादक*

बहुतेकांना प्रवासाची आवड लहानपणापासून असते. सुट्टी असेल, वेळ मिळेल तेव्हा कुठेतरी दूरवर फेरफटका मारून आल्याशिवाय चैनच पडत नाही. निरनिराळे गड, डोंगर चढून पालथे घालायला मला देखील आवडते. डोंगर गड चढताना अनेक वेळा कित्येकांना शारीरिक त्रासही होतो. पण वरती पोहोचताच जो काही अवर्णनीय आनंद होतो त्यापुढे हा त्रास काहीच नसतो. अशातूनच गिर्यारोहणाचा छंद जोपासला जातो.

गिर्यारोहण (Hicking) आणि ट्रेकिंग हे दोन्ही प्रकार वेगळे आहेत. गिर्यारोहण हा प्रकार ट्रेकिंगपेक्षा फार निराळा आणि कठिण आहे. गिर्यारोहणात अवघड शिखरे सर करायची असतात. पिटॉन, कॅरॅबिन, नायलॉनचे प्रचंड क्षमतेचे दोर इत्यादि साधनांचा उपयोग करावा लागतो. साधारण पंचवीस किलो वजन हॅवरसॅकमध्ये पाठीवर घेऊन चढायचे असते.

एकदा का डोंगर चढायला सुरवात केली की मनुष्यमात्राशी संबंध तुटतो. अन्नपाणी मिळण्याची आशा कमी होते. आणि एवढ्या मोठ्या डोंगरावर सोबत करतात फक्त आपले सहकारी.

2/Lt.डी. सी. मांजरामकर मॅडम यांनीही आम्हा सर्व एन्.सी.सी. आर्मी गर्ल्संना ट्रेकिंगला जायचे ठरवले. खरेतर आम्ही माथेरानला जायचे ठरवले होते. परंतु आयत्यावेळी एम.टी.डी.सी. चे रेस्ट हाऊस मिळणे मुष्किल झाल्याने आम्ही तेथे जायचे रद्द केले. शेवटी आम्ही टिटवाळ्याला जायचे ठरवले.

ठरल्याप्रमाणे आम्ही सतरा कॅडेटस् 2/Lt.डी. सी. मांजरामकर मॅडम, P.I. प्रधानसर दिनांक १६ जानेवारी २००० रोजी सकाळी ६.३० वाजता युनिफॉर्म मध्ये ठाणे रेल्वे स्टेशनवर टिटवाळ्याला जायला जमलो. सकाळी ८.३० वाजता आम्ही टिटवाळा स्टेशनला पोचलो. रेल्वे स्टेशनहून आम्ही टिटवाळ्याच्या गणेश मंदिरात पायी चालत गेलो. स्टेशन पासून मंदिरापर्यंत जायला आम्हांला १५ ते २० मिनिटे लागली. सर्वांनी बाहेर हातपाय धुऊन श्रीगणेशाचे दर्शन घेतले. मंदिराच्या आवारातच एक पुस्तक प्रदर्शन लागले होते.



सहलीच्या विद्यार्थिनी

मंदिरात आम्ही जवळपास १ ते १.३० तास तरी होतो. त्यानंतर आम्ही टिटवाळ्याच्या जवळ असणाऱ्या एका डोंगरावर जायला निघालो. हवेत सकाळचा गारवा अजूनही होताच. आम्ही सर्वजण शिस्तीमध्ये मार्गक्रमण करीत होतो. मार्गातच आम्हाला २ नाले मिळाले. त्यात

आम्ही मोठे दगड टाकून येण्याजाण्याची वाट बनवली. चालता, चालता मध्येच आम्हाला समजेना की कोणत्या वाटेने जावे इतक्यात आम्हांला एक अदिवासी मनुष्य भेटला त्याने आम्हाला वाट दाखवली. २ तासाच्या चालण्यानंतर आम्ही डोंगरावर पोचलो.

डोंगरमाथ्यावर एका पीर बाबांची समाधी होती. बाजूला एक पडके घर होते. आम्ही जवळच एका झाडाच्या सावलीत सर्वांनी सतरंजीवर आपले बस्तान मांडले व आपापले डबे उघडले. सर्वांनाच फार भूक लागली होती. डबे उघडल्यावर सर्वांनी एकदम ॲटॅक केला. डबे खावून झाल्यावर आम्ही सर्वांनी गाणी म्हटली, जोक्स् सांगितले.

परत आम्ही चालतच टिटवाळा स्टेशनला आलो. ठाणा लोकलनी ठाण्याला आलो. व अश्या रितीने आमचा ट्रेक पार पडला. आम्ही जेथे डबा खात बसलो होतो तेथे आमच्या बरोबर एक कुत्रा बसला होता जो आम्हांला डोंगर चढण्यापासूनच सोबत करत होता. आम्ही डबे खाताना देखील तो आमच्या सोबत होता. आम्ही सर्वांनी त्याला आमच्यातले थोडे खायला दिले. त्याने त्यातले थोडे खाल्ले व इतर खाण्याचे म्हणजे चपात्या, थालीपीठ वगैरे त्याने झाडाच्या बाजूला ठेवून दिले. बहुतेक करुन तो अन्नाचा साठा करुन ठेवत असावा. ज्यावेळेस त्याला काही खायला मिळणार नाही किंवा भूक लागेल तेव्हा तो आऊन ते खाणार असावा. आम्ही त्या कुत्र्याचे नामकरण केले. आम्ही त्याचे नाव 'रघु' ठेवले. तो 'रघु' देवळापासुन ते पीर बाबांच्या समाधी पर्यंत व तेथून रेल्वे स्टेशनपर्यंत आमच्या सोबत होता. ट्रेन सुटेपर्यंत तो प्लेटफॉर्मवर बसून होता.

N.C.C. Candet L/cpl संध्या राव
S.Y.B.A.

• • •

*With Best Compliments from*

# B.M. Securities

94/100, Rungla Bhawan,
12, Ground floor, Fanaswadi,
Mumbai - 400 002.

ईर्षा आणि असूया ही विवेकाची वैरीण आहे.

# विमान सेवेतील व्यवसाय

श्री. प्रवीण वि. प्रधान

*नव्या काळात नवे व्यवसाय झपाट्याने विकसित होत आहेत. विमान सेवेतील अशाच काही व्यवसायांची ही ओळख- संपादक*

तुम्हाला विमानातून नेहमी प्रवास करायला आवडेल? तुम्हाला लोकांमध्ये मिसळायला मजा वाटते? बँकेपेक्षा विमानतळावरच्या चैतन्यमय वातावरणात पैसे मोजायला कसे वाटेल? आणि शेवटी, लोकांचा विमानप्रवास आनंददायक करून त्यांची सुखस्वप्नें साकार करायला मदत करण्याची तुमची इच्छा आहे? या सर्व प्रश्नांना 'होय' असेच उत्तर असेल तर विमान वाहतूक क्षेत्रातील आव्हान देणारे नोकरी व्यवसाय तुमची वाट पहात आहेत!

विमानसेवेचे खाजगीकरण व मुक्त आकाशसंचार या धोरणांमुळे विमान कंपन्या तसेच हवाई टॅक्सींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याचा फायदा म्हणजे विमानवाहतूक सेवेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन त्या क्षेत्रात पुष्कळ मोठ्या प्रमाणावर नोकरी व्यवसाय उपलब्ध होऊ लागले आहेत. १०वी नंतर चाकोरीबाहेरचे काही अभ्यासक्रम वरकरणी खूप खर्चिक वाटतात. पण मुलांचा कल नसतानाही प्रतिष्ठेसाठी काही लाख रूपये भरून विनाअनुदान महाविद्यालयात त्यांना पाठवण्यापेक्षा तेवढ्याच किंवा त्या पेक्षा कमी पैशात उपलब्ध असणाऱ्या हवाईक्षेत्रातील व्यवसायाचा पालकांनी व विद्यार्थ्यांनी जरूर विचार करावा. या व्यवसायात प्रशिक्षण देणाऱ्या एअर इंडिया स्टाफ कॉलेज, इंडियन एअरलाईन्स, तसेच फ्लाईंग क्लब व खाजगी संस्थासुद्धा आहेत. मात्र खाजगी संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी संस्थेची कायदेशीर मान्यता, व्यवसायातील अनुभव, प्रशिक्षणाचा दर्जा व मुख्य म्हणजे नोकरीची शाश्वती. (प्लेसमेंट रेकॉर्ड) याची माहिती मिळवावी. संस्थेच्या विद्यार्थ्यांशीसुद्धा संपर्क साधावा. हवाईवाहतूक नोकरी व्यवसायात मिळणारे वेतन व सोयीसुविधा (पर्कस्) विचारात घेतल्यास अभ्यासक्रमांसाठी लागणारा खर्च परवडण्यासारखा आहे याची खात्री पटेल.

या व्यवसायात पायलट, हवाई सुंदरी (एअर होस्टेस), पर्सर, एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनियर, ट्राफीक असिस्टंट एवढेच व्यवसाय नसून चीफ इन्स्पेक्टर ऑफ फ्लाइंग, डेप्युटी डायरेक्टर(फ्लाईट, स्टॅंडर्ड, एअर सेफ्टी रिसर्च अँड डेव्हलमेंट), चीफ इंजिनियर, एक्झामिनर ऑफ पर्सोनेल सीनियर इन्स्ट्रक्टर (नेव्हीगेशन), ग्लायडींग इन्स्ट्रक्टर, सायंटिफिक ऑफिसर, लायसन्स इंजिनियर, लिंक ट्रेनर, फायर ऑफिसर, रेडिओ ऑफिसर, ग्लायडिंग इन्स्पेक्टर, एरोड्रोम ऑफिसर, एअरक्राफ्ट इन्स्पेक्टर, कम्युनिकेशन/टेक्निकल ऑफिसर, कॅलिब्रेशन पायलट, फायबर ग्लास मेकॅनिक इ. वेगवेगळे अवसर उपलब्ध आहेत. एअर इंडिया आणि इंडियन एअरलाईन्स सर्वसाधारणपणे एअरहोस्टेस, पायलट, फ्लाईट पर्सर, ट्रेनी टेक्निशियन, ग्रॅज्युएट इंजिनीयर ट्रेनी(गेट), अॅप्रेंटीस, टेक्निकल ऑफिसर्स, नॅव्हिगेशन इंस्ट्रक्टर, ट्रॅफीक असिस्टंट/ऑफिसर अशा वेगवेगळ्या जागांसाठी प्रशिक्षण देतात. एअर इंडिया स्टाफ कॉलेज (दूरध्वनी क्र. ६१५७७७७ विस्तारीत क्र. ४४९) इंडियन एअर लाइन्स ट्रेनिंग कॉलेज येथून अधिक माहिती मिळू शकेल. तसेच, इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशन (IATA वेबसाईट www.iata.org/atdi) डिरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हील एव्हीअेशन (सिव्हिल एव्हिएशन ट्रेनिंग सेंटर, अलाहाबाद

व कलकत्ता) यांच्याशी संपर्क साधावा.

**हवाईवाहतूक क्षेत्रातील कांही वैशिष्ट्यपूर्ण नोकरी व्यवसाय असे आहेत : इनफ्लाइट क्रू**

**१. पायलट -** व्यावसायिक वैमानिक परवाना (कमर्शिअल पायलटस् लायसेन्स) मिळवण्यासाठी ज्या सरकारी परीक्षा घेतल्या जातात, त्यांची तयारी करण्यासाठी फ्लाईंट क्लब तसेच अधिकृत खाजगी संस्था आहेत. तेथे पुढील उड्डाण प्रशिक्षण घेण्यासाठी बँका व धर्मादाय संस्थातर्फे मिळणारे आर्थिक सहाय्य तसेच दलित विद्यार्थ्यांना भारत सरकार व महाराष्ट्र शासनातर्फे फ्रीशीप, शिष्यवृत्ती व कर्ज या संबंधी माहिती मिळू शकते. प्रायव्हेट पायलटस् लायसेंस प्राप्त असलेल्या आणि आर्मड फोर्सेस मेडिकल कॉलेज एस्टॅब्लिशमेंट(AFMCE) दाखला असलेल्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थी/विद्यार्थिनींना इंदिरा गांधी उड्डाण ॲकॅडेमी फुरसतगंज एअरफिल्ड, रायबरेली २२९३०२ (उ.प्र.) (दिल्ली कार्यालय : पी.टी.आय. बिल्डींग, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१) येथे 'कमर्शिअल पायलट लायन्सेससाठी प्रशिक्षण दिले जाते. वयोमर्यादा १८ ते २३ वर्षे. पीपीएलचे प्राथमिक ६० तास प्रशिक्षण आणि IGRUA च्या दीड वर्षे व २६० तास उड्डाण कालावधीच्या या प्रशिक्षणासाठी एकूण खर्च ३ ते ४ लाख रुपयांचा होतो.

**२. हवाई सुंदरी (एअर होस्टेस) :** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा १०+२ परीक्षेनंतर हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग मधील संस्थेचा तीन वर्षांचा डिप्लोमा, १९ ते २५ वयोमर्यादेतील अविवाहित स्त्री, १५७ से.मी. पर्यंत उंची व त्या प्रमाणात वजन, निकोप दृष्टी (कमीत कमी दूर दृष्टी ६/२४), आकर्षक शरीरसौष्ठव या गोष्टी तुमच्याकडे असल्या तर तुम्ही हवाई सुंदरीच्या नोकरीसाठी जरुर प्रयत्न करा. इंग्रजी व हिंदी भाषांबरोबर एक-दोन परकीय भाषा अवगत असल्यास अशा स्त्री उमेदवारांना साहजिकच प्राधान्य मिळते. यातील प्रवेशासाठी पर्सोनल मॅनेजर, रिक्रुटमेंट सेक्शन, ह्यूमन रिसोर्सेस डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, ओल्ड एअरपोर्ट, कालीना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०००२९ किंवा पर्सोनल मॅनेजर, इंडियन एअरलाईन्स, ओल्ड एअरपोर्ट, कालीना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०००२९. तसेच परदेशी विमान कंपन्यांच्या नजिकच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**३. फ्लाईट पर्सर :** फक्त पुरुषांसाठीच मर्यादित असलेल्या या व्यवसायासाठीची पात्रता पुष्कळशी हवाई सुंदरीप्रमाणेच असते.

**४. एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनीयर :** १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाकरता बॉम्बे फ्लाईंग क्लब, जुहू रोड, मुंबई ४०००४९. हिंदुस्थान इलेक्ट्रॉनिक्स ॲकॅडेमी, ६१, केंब्रीज रोड, उलसूर, पी.बी. ८०६, बंगलोर इ. संस्थांशी संपर्क साधावा.

**ग्राउंड क्रू**

**ट्राफीक असिस्टंट :** या मध्ये तिकीट आरक्षण, डॉक्युमेंटेशन (वेगवेगळ्या वकिलातींची कायदेविषयक माहिती) इ. विमान प्रवाशांना मदत करण्याचे काम असते. पदवीधर इच्छुकांसाठी एअर इंडिया आणि इंडियन एअरलाईन्स तर्फे लेखी परीक्षा व मुलाखतीनंतर यशस्वी विद्यार्थ्यांना नोकरीत समाविष्ट केले जाते. प्रत्येक विमान कंपनी कॉम्प्युटराईज्ड रिझर्वेशन सिस्टीमस करता Amadeus, Apollo, Galileo व Sabre हे कॉम्प्युटर सॉफ्टवेअर वापरतात. हे प्रशिक्षण असलेल्या उमेदवारांना ट्राफीक असिस्टंट व्यवसायात प्राधान्य मिळते.

**हवाई वाहतूक व्यवसायातील फायदे :** या क्षेत्रात इतर व्यवसायांपेक्षा वेतन चांगले असते. जगभरातील लोकांशी संपर्क येतो; स्वतः तसेच कुटुंबियांकरता मोफत हवाई प्रवास; परदेशात नोकरी करण्याची संधी; फ्लाईट क्रु करता विशेष भत्ता.

---

चित्र ही हाताची कृती आहे, परंतु चारित्र्य मनाची कृती आहे.

स्वतःची आवड व कल लक्षात घेऊन नव्या सहस्रकातील (मिलेनियम) हवाई वाहतूक या आव्हानात्मक व आकर्षक भवितव्य असलेल्या व्यवसायाचा आजच्या युवा पिढीने जरूर विचार करावा.

१०वी नंतर उपलब्ध असलेल्या चाकोरीबाहेरच्या वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची आपणास माहिती हवी असल्यास प्रस्तुत लेखकाशी (दूरध्वनी: ५४२५९२६) जरूर संपर्क साधावा.

**प्रवीण वि. प्रधान**
३३/१०२, सोनचंपा, वसंत विहार, पोखरण नं. २,
ठाणे (प.) ४०० ६०१.
दूरध्वनी : ५४२ ५९२६

• • •

With Best Compliments from

**KUYA PAPERS**

C-105, Station Plaza,
Bhandup (W.), Mumbai 400 078.

## स्त्री

आजची स्त्री अजूनही त्याच चौकटीत रहाते आहे
चूल, मूल, संगोपन, अर्थार्जन
या चौकटीतूनच दिसणारे आभाळ पहाते आहे
कारण, तिने भरारी घेऊन मोकळे आभाळ पाहू नये
म्हणून, तिचे पंखच छाटले आहेत मर्यादेने
ही मर्यादा पुरुषी अहंकाराची
घरातील मोठ्या स्त्रीच्या मानसिकतेची
कधी थांबेल हे सगळं ?
कधी थांबेल ही घुसमट ?
निदान आमच्या मुलींच्या नशिबी तरी असा भोगवटा नको.
त्यांच्याही पंखात बळ आहे
अजमावू दे ते त्यांना
घेऊ दे भरारी आणि मोकळा श्वास,
हीच केवळ राहील आस !

**सौ. मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बंगला,
पंचपाखाडी रोड, नौपाडा, ठाणे ४०० ६०२

• • •

ठाण्यातील प्रसिद्ध कवी निरंजन उजगरे यांनी अनुवादित केलेल्या 'हिरोशिमाच्या कविता' या पुस्तकाचे प्रकाशन दिनांक ५ ऑगस्ट २००० रोजी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. य.दि. फडके यांच्या हस्ते झाले. 'तोगे संकिची' यांच्या मूळ कवितेचे भाषांतर मित्रवर्य उजगरे यांच्या अनुमतीनुसार येथे देत आहोत. ही कविता हिरोशिमातील स्मृतिस्थळे उभारलेल्या ग्रॅनाइट दगडावर कोरलेली आहे.

आमचे बाबा परत द्या,

आमची आई परत द्या,

आमचे वृद्ध परत द्या,

आमची मुलं परत द्या,

आमची माणसं परत द्या,

आमचे आम्हालाच परत द्या,

जोवर माणसं माणसं म्हणून जगतायत,

तोवरच त्यांना

चुराडा होऊ न शकणारी शांती परत द्या.

तोगे संकिची

('हिरोशिमाच्या कविता' या संग्रहावरून साभार)

# एक रोमांचकारी व अद्भुत असा अनुभव

श्री. राजाभाऊ गवांदे, निवृत्त न्यायाधीश

*आळंदी या तीर्थक्षेत्राशी अनेकांचा भावनिक संबंध असतो. त्यातही ज्ञानेश्वरीचा अभ्यास असणाऱ्या अभ्यासकाला आळंदीचे महत्त्व वेगळेच असते. असेच एक अभ्यासक मा. गवांदे यांच्या अनुभवार आधारित हा लेख -: संपादक*

आळंदीचे वर्णन अलकापुरी असे करण्यात येते. मला आळंदीचे आकर्षण आहे. ज्ञानेश्वर माऊली बद्दल ओढ आहे. त्या आळंदीला इंद्रायणी काठी मला अलिकडेच आलेल्या अनुभवाची हकिगत मी या लेखात पुढे सांगत आहे. पण तत्पूर्वी मला एका घटनेचा थोडा तपशीलवार आलेख मांडायचा आहे. ती घटना अशी.

१९६३ साली माझ्या धाकट्या मुलीचा चि. संध्याचा जन्म झाला. त्या वेळी आम्ही पुण्याला शिवाजीनगर भागातील एका बंगल्यात रहात होतो. माझ्या पत्नीला-सौ. विजयालक्ष्मीला दिवस गेले तेव्हा तिच्या गरोदरपणात व बाळंतपणात मदत व्हावी म्हणून माझी आई ती. जीजी माझ्याकडे मुद्दाम आली होती. मी रोज ज्ञानेश्वरीचे वाचन करावे असे जिजींने सुचविले. ते जन्माला येणाऱ्या जीवाच्या हिताचे व चांगले संस्कार करणारे ठरेल ही त्या सूचने मागची तिची भूमिका. त्या प्रमाणे मी रोज रात्री ज्ञानेश्वरी वाचू लागलो. घरातील सर्वजण आणि पत्नीच्या परिचयाच्या काही बायका त्यावेळी हजर असत. ज्या रात्री सौ. च्या पोटात दुखू लागले. कळा सुरु होण्याची ती पूर्व लक्षणे जिजीने ओळखली व मी वाचन थांबवावे असे तिने सुचविले. ज्ञानेश्वरीच्या त्या पानात खूण म्हणून मी कागदाचा एक कपटा ठेवला आणि पत्नीला दळवी मॅटर्निटी मध्ये पाठविले. जिजी व माझा धाकटा भाऊ चंद्रकांत तिच्या बरोबर होते. घरातील व्यवस्था लावून मी काही वेळाने तेथे पोचलो. व्हरांड्यात डॉ. हिरा नाईक व जिजी अशा दोघी उभ्या होत्या. त्यांनी मला पाहिले. जिजी म्हणाली, 'दादा, लक्ष्मीला ज्ञानेश्वरी झाली. आम्ही पोहोताच डॉ. हिराने लक्ष्मीला लेबररुम मधील टेबलावर घेतले आणि त्याच क्षणी मध्ये कुठलीही उसंत, सवड न लागता ती बाळंतीण झाली. डॉ. हिरा नाईक म्हणाल्या, 'येथे पोचायला दोन मिनिटांनी जरी उशीर झाला असता तर रस्त्यात गाडीतही हे होऊ शकले असते.' जिजी म्हणाली की ते संकट टळले व लक्ष्मी सुखरुप बाळंत झाली ही त्या माऊलीचीच कृपा. सोयर संपल्यावर पुनः ज्ञानेश्वरीचे वाचन सुरु झाले. व एक दिवस पसायदान म्हणून मी अठराव्या अध्यायाचे वाचन पूर्ण केले. त्यानंतर आम्ही सगळेजण आळंदीला गेलो. चि. संध्याला समाधीच्या पुढ्यात ठेवले. जिजीने आळंदीला काही धार्मिक गोष्टी पुऱ्या करायच्या ठरविल्या होत्या. त्या पूर्ण केल्या. तिला झालेले समाधान तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. ते मी न्याहाळले. मनोमन समाधान पावलो. आळंदीच्या आणखीही काही आठवणी आहेत. त्या पैकी एक ताजी आठवण अगदी अलीकडची आहे. सुरवातीस सूचित केल्याप्रमाणे त्या आठवणींचा अनुभव आणि काहीसे प्रकट चिंतन असे या लेखाचे स्वरुप आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर हे मराठी अस्मितेचे आद्य शिल्पकार. त्यांचे ज्ञानेश्वरीतील पसायदान म्हणजे त्या ग्रंथाच्या देवालयावरील सुवर्णकलश होय. पसायदान ही प्रार्थना आहे. ही प्रार्थना त्यांनी सर्वकालीन मानवजातीसाठी केलेली आहे आणि ज्या देवाला संबोधून त्यांनी ही प्रार्थना केली आहे तो देव विश्वात्मक आहे. अठरा अध्यायांची ही ज्ञानेश्वरी अथपासून इतिपर्यंत सुंदरच आहे. परंतु अठराव्या अध्यायातील पसायदानाने एक अभूतपूर्व अशी उंची गाठली

आहे. विविध भाषेतील धर्म साहित्याचा अभ्यास करणारे जानकार सांगतात की या प्रार्थनेचा जो आवाका आहे, जो आशय आहे आणि तीत जी आर्तता आहे त्या सर्वांचा विचार केला असता ही प्रार्थना खरोखरीच अद्वितीय ठरते आणि तिला विश्वगीताचा दर्जा मिळावयास हवा असे म्हणावेसे वाटते. ज्ञानेश्वरी आम्हा मराठी भाषिकांना नित्य भूषण वाटावी अशीच आहे. विनोबा भाव्यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे मराठी साहित्य उणे ज्ञानेश्वरी बरोबर शून्य, असे म्हणावे लागेल.

अशा ज्ञानेश्वरीचे कर्ते जे ज्ञानेश्वर त्यांचे आळंदी हे जन्मगाव. आणि त्यांनी संजीवन समाधी घेतली ती आळंदीलाच. त्यामुळे आपणा सर्वांना ते तीर्थस्थान वाटते; क्षेत्रस्थान वाटते. आळंदी इंद्रायणीच्या काठी वसली आहे. आळंदीच्या जोडीला देहूचा उल्लेख करणे आणि संत तुकारामांचे स्मरण करणे ओघानेच येते. भौगोलिक दृष्ट्या इंद्रायणी देहूहून निघून आळंदीच्या दिशेने वाहते. परंतु अध्यात्माच्या दृष्टीने तिचा प्रवाह आळंदीहून निघून देहूच्या दिशेने वाहत आहे. म्हणूनच 'ज्ञाने रचिला पाया । तुका झालासे कळस ।' हे वचन सार्थ ठरते. आणि आळंदीच्या जोडीला देहू हेही तीर्थस्थान ठरते; क्षेत्रस्थान ठरते.

वरील पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र आळंदी -देहू परिसर विकाससमितीने गेल्या दशकाहून अधिक काळ केलेले विकासाचे काम व महत्त्व समजून घेतले पाहिजे.

माझा व आळंदी गावाचा संबंध गेल्या पाच दशकांचा आहे. मी पुण्याला कायद्याचा विद्यार्थी होतो तेव्हा पासूनचा हा संबंध आहे. मी पुण्याला न्यायाधीश होतो तेव्हाही आळंदीला जाण्याचे प्रसंग वरचेवर वर आले. इंद्रायणीचा परिसर, समाधी मंदिराचा परिसर आणि एकंदरीत आळंदी गावची त्या वेळची परिस्थिती आणि आता म्हणजे दि. २ मार्च २००० माघ वद्य ११ ॥ शके १९२१ ॥ गुरुवार रोजी मी आळंदीला भेट दिली. त्यावेळची परिस्थिती यात मला महदंतर वाटले. श्री क्षेत्र आळंदीचा कायाकल्प होत आहे असे उत्स्फूर्त उद्गार माझ्या मुखातून बाहेर पडले. इंद्रायणीच्या ऐलतीरावर संत श्री निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान मुक्ताबाई यांची नावे असलले, आणि पैलतीरावर श्री संत श्री नामदेव, तुकाराम, एकनाथ, जनाबाई यांची नावे असलेली सुरेख घाट पाहून नजरेचे पारणे फिटले. घाटांवर संगमरवरी गोमुखे बसविलेली दिसली. त्या द्वारे वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाण्याची सोय झाली आहे. शुध्द पाणी हेच खरे तीर्थ होय. हे सारे मी सारांशाने सांगत आहे. देखावा किती बदलला आहे व तो किती मनोहारी झाला आहे याची पूर्ण कल्पना यावी या साठी या क्षेत्रस्थानाला भेट देणे हाच एक मार्ग आहे. ही सौंदर्यानुभूती हा सांगण्याचा विषय नाही; अनुभवण्याचा विषय आहे.

मला तेथे जाण्याचे निमित्त होते एक भाग्यशाली निमंत्रण. वर उल्लेखिलेल्या एकादशीस 'संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम' या विषयावर एक व्याख्यान मी द्यावे असा समितीचे कार्याध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड यांचा निरोप आला. मी व माझी पत्नी त्या निमंत्रणावरून आळंदीस गेलो. प्रथम माऊलींच्या संजीवन समाधीचे दर्शन घेतले. आणि नंतर श्री संत तुकाराम महाराज घाटावर 'विश्वरूप दर्शन मंच' या भव्य व्यासपीठावर माझे व्याख्यान झाले. व्याख्याने देण्याची मला बऱ्याच वर्षांपासूनची सवय आहे. पण या मंचावर व्याख्यान देणे हा एक रोमांचकारी व अद्भुत असा अनुभव होता. सुमारे शंभर फूट लांबीचा हा मंच. त्या मंचावर माऊलींची व तुकोबाची भव्य चित्रे. पाठीशी सुमारे पंच्याहत्तर बाय पन्नास फुटांची अतिभव्य मजबूत अशी भिंत. आणि त्या भिंतीचा वापर ज्यावर चित्रपट दाखवावा अशा पडद्या सारखा. मी बोलत होतो. व्हिडीयो कॅमेरा माझे भाषण चित्रित करीत होता आणि त्याच क्षणी समोरच्या प्रोजेक्शनरूम मधून ते सारे दृश्य त्या भव्य पडद्यावर दाखविले जात होते. सुमारे एक लाख लोक पाहू शकतील अशी ती वैज्ञानिक योजना. श्री संत ज्ञानेश्वर-तुकाराम

---

श्रीमंत कोण? दुकानात गेल्यावर कमी किंमतीचा माल दाखव असे सांगायला जो घाबरत नाही.

महाराज ज्ञानतीर्थ हे त्या भिंतीरूप पडद्याचे नाव. माझ्या व्याख्यानाचे प्रास्ताविक डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले व ह.भ.प. किसन महाराज साखरे यांनी सुरेख समारोप केला. माझ्या भाषणानंतर त्याच मंचावर सुश्राव्य असे भजन झाले. मंचासमोरील खुर्च्यांवर बसून आम्ही ते सारे पहात होतो, ऐकत होतो. सुरुवातीस आमच्या हालचालींची काही दृश्ये आम्ही पडद्यावर पाहिली व त्यावरून मी भाषण देत असताना केवढे भव्य चित्र पडद्यावर दिसत असेल याची कल्पना आली. माझ्या जीवनातील अध्यात्मिक क्षेत्रातील अनुभवांचा जर विचार केला तर त्या दिवशीचा त्या मंचावरील अनुभव हा कळसाध्याय म्हणावा लागेल. पारंपरिक भाषेत सांगायचे झाल्यास पूर्वसुकृताची व संचिताची जोड असल्याशिवाय असा अनुभव मिळणे केवळ अशक्य असेही म्हणावे लागेल.

व्याख्यानानंतर मला व माझ्या पत्नीला शाल व श्रीफळ देण्यात आले. मला जरीबुट्टीचे सुरेख काम केलेली शाल तर मला माऊलीचा प्रसादच वाटला. या प्रसंगी मला आलेला अनुभव जसा अविस्मरणीय तसाच अवर्णनीय होता. मला त्या क्षणी माझ्या दिवंगत मातेचे, जिजीचे उत्कटतेने स्मरण झाले.

माझ्या पुढील भेटीत मी श्री क्षेत्र देहू येथील विकास समितीने केलेले काम पाहीन.

आपल्याकडे वैयक्तिक स्वच्छतेचा विचार व आचार आढळतो. परंतु सार्वजनिक स्वच्छतेचा विचारही आपल्या मनाला शिवत नाही; आणि तसा आचार तर दूरच राहिला. तीर्थाचे ठिकाण, क्षेत्राचे ठिकाण, मंदिराचा परिसर भव्य दिव्य तर असावयासच हवा. पण त्याच बरोबर तेथे कमालीची स्वच्छता ही असावयास हवी. स्वच्छ, सुंदर परिसरामुळे मनाला प्रसन्नता वाटते व अशी मानसिक प्रसन्नता हीच खऱ्या अध्यात्मिक अनुभवाची पहिली पायरी असते.

हे स्वच्छतेचे व्रत घेऊन परिसर विकासाचे काम कार्याध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड व त्यांचे सहकारी करत आहेत. या कामाला डॉ. कराडांचे समर्थ मार्गदर्शन लाभले आहे. हे एकट्या दुकट्याचे काम नव्हे. हा जगन्नाथाचा रथ पुढे नेण्याचा यत्न आहे. त्याला सर्वांचेच हात लागले पाहिजेत.

ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरी, पसायदान, संजीवन समाधी ही आळंदीची अविभाज्य अंगे होत. माऊलीने विश्वात्मक देवाजवळ साऱ्या मानवजातीच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. आणि म्हणूनच नजिकच्या भविष्यकाळात आळंदी हे 'विश्वशांती केंद्र' व्हावे असे मला मनापासून व उत्कटतेनेन वाटते. आज हे वाटणे स्वप्नस्वरूप आहे पण सर्वांनी सहकार्य केले तर हेच स्वप्न उद्याचे वास्तव होऊ शकेल. त्या स्वप्नपूर्तीसाठी लोकांनी वेळ द्यावा. शक्य असेल ती आर्थिक मदत करावी व विधायक सूचनाही कराव्यात आणि या दृष्टीने माझे महाराष्ट्र शासनाला एक विनंती आहे की शासनाने स्वतःच्या अखत्यारीत या विकास समितीस संपूर्ण आळंदी गावाच्या हद्दीतच परंतु अन्यत्र नव्याने उभारणी करण्यासाठी परवानगी द्यावी; शक्य असेल तेवढे आर्थिक साहाय्यही द्यावे. परिणामी आजचे जुने आळंदी गाव नव्याने वसविले जाईल. मंदिराभोवतीचा सारा परिसर मोकळा होईल आणि मंदिराला मध्यस्थानी ठेवून प्रतिभावंत स्थापत्य विशारदांच्या मदतीने 'विश्वशांती केंद्र' ला उपयुक्त ठरेल अशा प्रकल्पाची उभारणी तेथे करता येईल. सर्व संबंधितांनी माझ्या या सूचनेचा गंभीरपणे विचार करावा ही प्रार्थना.

**न्या. राजाभाऊ गवांदे**
बी/५, अर्हत्, राम मारुती रोड, ठाणे (प.) ४०० ६०२.
दूरध्वनी : ५३३ ४२७७

• • •

मद्यपी हा समाजस्वास्थ्याचा लुटारू आहे.

# ऑगस्ट २०००

**सौ. विशाखा देशपांडे**

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इं. मि. स्कूल :**

शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे - एकुण ७७ %

खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली

१) घोडगे स्वप्नील विजय - जिल्ह्यात ८वा
२) मोरे ऋतुजा अरुण - जिल्ह्यात १३वी
३) बोरवणकर अमेय उमेश - जिल्ह्यात १४ वा
४) केळकर ओमकार धनंजय - जिल्ह्यात १९वा

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल पुढील प्रमाणे -

एकूण निकाल १००%
खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली-

इ. ८वी - १) खाडे सुशांत श्रीराम
२) कुलकर्णी निखिल प्रमोद
इ.९वी - १) लाड प्रसाद भास्कर
२) कुलकर्णी उदय प्रकाश
३) म्हात्रे अमेय मंगेश
४) सरदेशपांडे सौरभ रत्नाकर

या सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांचे मार्गदर्शक शिक्षक व मुख्याध्यापिका सौ. कोल्हटकर यांचे 'दिशा' तर्फे अभिनंदन.

**सौ. मैत्रेयी शेवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार-**

❖ दि. १/७/२००० रोजी ह्या वर्षी इंटरॅक्ट क्लब चा उद्घाटन सोहळा पार पडला. रोटरी क्लबचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी आले होते. इंटरॅक्ट क्लबच्या गतवर्षीच्या पदाधिकाऱ्यांनी नवीन निवडलेल्या पदाधिकाऱ्याकडे सूत्रे सोपवली. मॉडेटर म्हणून शाळेतील शिक्षिका सौ. भारती पाटील व सौ. ए. सुमति यांची निवड केली गेली.

❖ नीता शारदा, मेधा लाड, भारती पाटील व मनिषा साळी यांनी उल्हासनगर येथे जाऊन गाईड प्रशिक्षण पूर्ण केले.

❖ जिल्हा परिषद आयोजित संगणक प्रशिक्षणासाठी मैत्रेयी शेवडे व नीता शारदा यांची निवड केली गेली. त्यांनी यशस्वी रित्या प्रशिक्षण पूर्ण केले.

❖ विनिता गोखले यांनी लायब्ररी सेमिनारला उपस्थित राहून मिळणाऱ्या नवीन ज्ञानाचा लाभ घेतला.

❖ इ.१०वी च्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. आनंद नाडकर्णी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी मानसिक व शारीरिक आजार व त्यांच्यावर मात करण्यासाठी उपाय यावर चर्चा केली. नाट्यीकरणासारख्या माध्यमातून हा संवाद साधला गेला.

❖ डॉ. म्हसकर व त्यांच्या डॉ. कन्या यांनी प्रथमोपचारासंबंधी आवश्यकता व प्रथमोपचार कसे करावे हे प्रात्यक्षिकांद्वारे करून दाखवले.

❖ इ.९वी चे स्काऊटस् व गाईड्स गिर्यारोहणासाठी बदलापूर येथे गेले होते. त्यांना स्काऊट गाईड कॅप्टन् अपर्णा भोळे, उल्का कुलकर्णी, शिल्पा भांगले, आहेर सर इत्यादिंनी मार्गदर्शन केले. इ.९वी चे स्काऊट्स व गाईड्स गिर्यारोहणासाठी येऊर (हरियाली) येथे गेले होते. त्यांना शिल्पा भांगले, विनिता गोखले, मनिषा रानडे, केशवसर व आहेरसर यांनी मार्गदर्शन केले.

❖ दि. ३०/७/२००० रोजी शाळेत गणित संबोध परीक्षा झाली. इ. ५वी व इ.८वी च्या विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

❖ शिवनेरी संस्था आयोजित चित्रकला स्पर्धेत अनेक

विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कलाशिक्षिका अपर्णा भोळे व मनिषा साळी यांनी मार्गदर्शन केले. संयोजकांनी आनंदीबाई जोशी शाळेच्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इं. मि. स्कूल प्राथमिक विभाग-**

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा निकाल खालील प्रमाणे

खालील विद्यार्थ्यांना पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

१) जोशी निखिल रविंद्र
२) सावंत तेजस एकनाथ
३) देवगेकर सई शरद
४) भोगले संकेत सीताराम

या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग-**

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील सुयश**

❖ फेब्रुवारी २००० मधे घेण्यात आलेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत शाळेतील **१) सागर अरुण शिंदे २) मंगेश मुकुंद पुराणिक ३) सिद्धेश शिरीष सिनकर ४) ओंकार दीपक लिमये** हे विद्यार्थी **गुणवत्ता यादीत अनुक्रमे ७व्या, १७व्या, १९व्या व २१व्या** क्रमांकावर चमकले.

**गुरुपौर्णिमा उत्सव**

❖ इ. ५वी ते ८वी, १०वी क,ड च्या विद्यार्थ्यांनी आपआपल्या वर्गात गुरुपूजन केले. गुरुंना गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. काही वर्गात या निमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

❖ इ.९वी गुरुपौर्णिमा उत्सवाचे औचित्य साधून या कार्यक्रमासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च मधील रसायन शास्त्राचे संशोधक डॉ. दिगंबर बेहेरे यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांचा थोडक्यात परिचय असा -



डॉ. दिगंबर बेहेरे

❖ TIFR मधे रसायन शास्त्राचे संशोधक. आंतरराष्ट्रीय नियतकालिकातून ५०च्या वर लेख प्रसिद्ध. ❖ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक परिषदेत शोध निबंध सादर केले व वाचले. ❖ इंडियन बायोफिजिक्स सोसायटीचे आजीव सदस्य ❖ मुंबई विद्यापीठात Ph.D साठी केमिस्ट्रीचे मार्गदर्शक ❖ मुंबई ग्राहक पंचायतीच्या ठाणे विभागाचे कार्याध्यक्ष म्हणूनही ते काम पाहतात.

❖ इ. ९च्या कार्यक्रमाची सुरुवात 'कुंभारा सारखा गुरु नाही रे जगात' या गुरुमहिमा सांगणाऱ्या गीताने झाली. यानंतर काही विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. बेहेरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की आपण जरी मराठी माध्यमात शिकत असलो तरी पुढच्या आयुष्यात कुठेही मागे पडत नाही. आत्ता पासूनच इंग्रजी विषया संबंधीची भीती घालवा. आपले इंग्रजी धडे मोठ्याने वाचा त्यामुळे उच्चार सुधारतील. त्याचबरोबर टाइम्स ऑफ इंडिया हे वर्तमानपत्र नियमित वाचा त्यामुळे तुमचा शब्दसंग्रह वाढेल. अभ्यासाचे वेळापत्रक तयार करुन त्याप्रमाणे सराव करा नक्की यशस्वी व्हाल. पुढे ते म्हणाले की केवळ डॉक्टर, इंजिनिअर या मळलेल्या वाटेने न जाता संशोधक व्हा. संशोधन फक्त विज्ञानातच करता येते असे नाही तर गणित, भाषा याही विषयात संशोधन करता येते. अर्थात् यासाठी अभ्यास हवा. तुमची जिद्द हवी. तेव्हा संशोधन क्षेत्राकडे

वस्त्र मंगी तुमची वाट पहात आहे.

यानंतर उपमुख्याध्यापिका सौ. ज्योत्स्ना चौथळ यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन सौ. सुनिता देशपांडे यांनी केले व आयोजन सौ. मंजिरी दांडेकर यांनी केले.

इ.१०वी अ च्या वर्गाने सौ. अश्विनी धारप यांना निमंत्रित केले होते. सौ. धारप यांनी कोणत्याही वाद्यांची साथ नसताना विविधांगी व विविध भाषेतील उत्कृष्ट गीते सादर केली. मार्गदर्शन सौ. कळमकर यांचे होते.

याच बरोबर १०ब च्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व काव्यातून, लेखातून व गीतातून सादर केले. याच वर्गातील कु. ओंकार सुर्वे याने 'आई' या विषयावर हस्तलिखित तयार केले. मार्गदर्शन सौ.लिमये यांचे होते.

❖ इ.८वी अ मधील कु. मृणालिनी नेवाळकर ही रायगड मिलिटरी स्कूल ने महाड येथे आयोजित केलेल्या उन्हाळी शिबिरात सहभागी झाली होती. तेथे झालेल्या हिंदी निबंध स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावला व शारीरिक शिक्षणाचे प्रशस्तीपत्रकही प्राप्त केले. या शिबिरासाठी विविध शाळांचे २०१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

❖ २०००-२००१ या वर्षात घेतल्या जाणाऱ्या गणित ऑलिंपियाड प्रशिक्षण वर्गासाठी इ.८वी मधील स्वप्ना गोरे, मंगेश पुराणिक, भूपेश शिरके यांची निवड झाली आहे.

❖ सप्टें. २००० मध्ये शासकीय चित्रकला परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. या शिबिरासाठी श्री. द.रा. पवळेकर (माजी प्रिन्सिपॉल रहेजा स्कूल ऑफ आर्ट, बांद्रे) यांचबरोबर ४० विद्यार्थी, सौ. मंजिरी दांडेकर, श्री. विलास कोळी, श्री. वासुदेव वैद्य हे सर्व कलाशिक्षक व पालक प्रतिनिधी सौ. व श्री. भालचंद्र कोळी उपस्थित होते. यात परीक्षेच्या विषयासंबंधी तसेच चित्रात होणाऱ्या संभाव्य चुका कोणत्या त्या कशा टाळता येतील या संबंधी चर्चा झाली. नंतर विद्यार्थ्यांनी एक संकल्पचित्र तयार केले. त्यावरही चर्चा झाली.

या शिबिराचे आयोजन सौ. मंजिरी दांडेकर यांनी केले होते.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग-**

❖ विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या प्राथमिक विभागातून फेब्रुवारी २००० मध्ये झालेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.




पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थीनी व मार्गदर्शक शिक्षिका


विशेष म्हणजे या परीक्षेत कु. अनुराधा ओगले ही विद्यार्थीनी ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असून महाराष्ट्र राज्यात २ऱ्या क्रमांकावर आहे. या सर्व विद्यार्थीनींचे गुणानुक्रम खालीलप्रमाणे-

| नाव | गुण ३०० पैकी | जिल्ह्यातील क्रमांक |
|---|---|---|
| १) अनुराधा ओगले | २८० | १ला<br>राज्यात २रा क्र. |
| २) स्मिता रमेश कोल्हे | २६६ | ६वा |

एका थेंबाने जी प्रतिष्ठा जाते ती हौदाने भरून येत नाही.



कु. अनुराधा ओगले



कु. स्मिता कोल्हे

| | | |
|---|---|---|
| ३) अनुश्री प्रकाश गोडबोले | २९.२ | ८वा |
| ४) गार्गी सतीश कुळकर्णी | २९.२ | १६वा |
| ५) रेणुका मिलिंद पेंडसे | २९.१ | १७वा |

या विद्यार्थीनींना सौ. भंडारे, सौ. घोरपडे, सौ. कुलकर्णी व सौ. गोखले या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

कु. स्मिता रमेश कोल्हे ही विद्यार्थिनी फेब्रुवारी २००० मध्ये झालेल्या इ. ४थी च्या गणित प्रज्ञा परीक्षेत ठिकाण महाराष्ट्र विद्यापीठात १०० पैकी ९९ गुण मिळवून २ऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

व्ही.पी.एम. -तंत्रनिकेतन

वर्ल्ड बँक प्रोजेक्टच्या अधिपत्याखाली शासकीय, निमशासकीय अथवा अशासकीय तंत्रनिकेतनाच्या उन्नतीकरता कर्ज देण्याची योजना आखण्यात येत आहे. हे कर्ज देऊन तंत्रनिकेतनाच्या सुविधांची सुधारणा करण्याचा शासनाचा मानस आहे. हे कर्ज देण्याची योग्यता पडताळण्याकरता SRG (State Resource Group) ची नेमणूक करण्यात आली आहे. हा ग्रुप वेगवेगळ्या तंत्रनिकेतनांना भेट देऊन त्यांच्याकडे अस्तित्वात असलेल्या सुविधा, शिक्षक वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय इ. ची पाहणी करणार आहे. हे कर्ज देऊन त्यांची परतफेड करण्याची क्षमता असणाऱ्या तंत्रनिकेतनांना अशा प्रकारची मदत देण्याचा शासनाचा मानस आहे. हे काम साधारण वर्षभर चालू राहील. TTTI भोपाळ व DIE, MSBTI World बँक यांच्या सहभाग असून त्या कमिटीवर वेगवेगळ्या शासकीय, निमशासकीय व अशासकीय तंत्रनिकेतनातील प्राध्यापकांची निवड करण्यात आली आहे. त्यात विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील इ.पी.एस्. च्या विभाग प्रमुख सौ. वडेर यांची निवड झाली आहे.



सौ. वडेर

खासदार प्रकाश परांजपे यांची तंत्रनिकेतनाला ३० जून रोजी भेट.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनास खासदार प्रकाश परांजपे यांनी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सौ.श्री. मुजुमदार यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

ए.आय.सी.टी. दिल्ली यांच्या प्रतिनिधींना हे आदर्शवत तंत्रनिकेतन दाखवावयास हवे व महाराष्ट्रात उत्तम प्रकारचे तंत्रनिकेतन वि.प्र. मंडळाचे आहे हे त्यांच्या लक्षात आणून द्यावयास हवे असे प्रशंसोद्गार श्री. परांजपे यांनी काढले. याप्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर व उपप्राचार्य ए.डी. नायक हेही उपस्थित होते.

केमिकल इंजिनियरिंग अभ्यासक्रम पुनर्रचना समितीवर प्राचार्य मुजुमदार यांची निवड.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनास आलेल्या पत्रानुसार तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सौ.श्री. मुजुमदार यांची अभ्यासक्रम

गुरुभक्ती म्हणजे भारतीय संस्कृतीतील मधुर काव्य आहे.

पुनर्रचना समितीवर निवड झाली आहे.

सदर डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्रकल्प बनविण्यात आला असून राज्यस्तरावर हे काम होणार आहे.

**विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे उज्ज्वल निकाल**

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे निकाल अलिकडेच जाहीर झाले असून प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही उज्ज्वल यश संपादन केले आहे.

प्रत्येक वर्षातील व विषयातील सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य सी.श्री. मुजुमदार व उपप्राचार्य प्रा. ए. डी. नायक यांनी पुष्पगुच्छ व पेढा देऊन विशेष अभिनंदन केले. निकालाचा तपशील पुढीलप्रमाणे-

प्रथम वर्ष - केमिकल इंजि. -संदीप पाटील (७२.४१% ), इ.पी.एस.-विनय राणे (८०.७३ %), इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स - कीर्ती नारकर-(७८.२७%), इन्स्ट्रुमेंटेशन - सरला व्यंकटेश (७३.०९%)



F.Y. V.P.M'S Polytechnic Topper Students

द्वितीय वर्ष - केमिकल इंजि.- चोमल आदित्य (७३.५८%), इ.पी.एस्.-प्रजापती जितेंद्र (७३.७१%),



S.Y. V.P.M'S Polytechnic Topper Students

इंड.इलेक्ट्रॉनिक्स-व्यंकटेश नारकर (८५.७५%), इन्स्ट्रुमेंटेशन - उदयराज खरवडीकर (७३.७९%)

तृतीय वर्ष - केमिकल इंजि. - मंगेश वावडेकर (७६.४८%), इ.पी.एस्.-नितेश टंगसाली (७३.७६%), इंड.इलेक्ट्रॉनिक्स-स्वप्ना गद्रे (८२.२८%), इन्स्ट्रुमेंटेशन - श्रीरंग देशपांडे (७५.२३%) या यशात प्राचार्य मुजुमदार सर, उपप्राचार्य नायक सर यांच्याबरोबरच सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा वाटा आहे. अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांचा निकाल अनुक्रमे पुढीलप्रमाणे - केमिकल इंजि. - ८१.०३%, ७१.६२% व ८८.४६% इ.पी.एस्.-५१.५१%, ८७.०४% व ८३.६७, इंड.इलेक्ट्रॉनिक्स-८८.०५%, ९०% व ८८.१३%, इन्स्ट्रुमेंटेशन - ८०.९५%, ९३.१०% व ८२%

• • •